# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २६३ I सोमवार ६ जुलै २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com


## नाडी संस्था व मानवी शरीर...



'सहजयोग'

भाग १००

आपल्यामध्ये ही सात चक्रे आहेत आणि ही कार्यान्वित असतात आणि हे सगळे अंडर करंट्स आपल्यामधले त्याने सगळी गती होते. सबंध शारीरिक जेवढे काही आहे, शारीरिक आपले जे काही आजार आहेत किंवा मानसिक त्रास आहेत ते या तीन नाड्यांवरती चालतात. त्यापैकी पहिली जी नाडी आहे तिला आम्ही इडा नाडी म्हणतो. त्याच्यामुळे लेफ्ट सिंपथेटिक नव्व्हस सिस्टीमची चालना होते. जी उजवीकडे आहे तिला आम्ही पिंगला नाडी म्हणतो. हिच्यामुळे राईट सिम्पथेटिक र्हस सिस्टीमची चालना होते आणि मधोमध जी नाडी आहे तिला सुषुम्ना नाडी म्हणतात. या नाडीमुळे आपल्या मी याला उत्क्रांती म्हणते. याची चालना होते. पण उत्क्रांतीसाठी पहिला आपला धर्म जमावा लागतो. जसे आज यांनी धर्माबद्दल सांगितलेले आहे, की माणसाला दहा धर्म आहेत. ते जर प्रस्थापित झाले, जसे बोट तयार करताना त्याचे दहा धर्म ठीक आहेत हे आपण पाहिले तर आपण त्याला समुद्रात सोडतो. ज्या मनुष्याचे दहा धर्म प्रस्थापित होतात त्याच्यामध्ये तेव्हा तो धर्मातीत होतो. म्हणजे तेव्हाच त्याची कुंडलिनी मधले जे चक्र आहे, ज्याला आम्ही नाभी चक्र म्हणतो आणि त्याच्या आसपास सर्व गुरूंचे स्थान आहे, ते गुरू तिथे बसून ते धर्म प्रस्थापित करीत असतात आणि गुरू सगळे अनेकदा या संसारात आले आहेत आणि अनेक कार्ये त्यांनी केली आहेत. शिर्डीचे साईनाथसुद्धा त्याच्यातले शेवटले गुरू आहेत आणि ही जी आपली नाभी चक्रावरची लक्ष्मी आहे आणि विष्णूचे जे स्थान आहे, त्यानेच आपल्याला उत्क्रांतीची इच्छा होते. त्यानेच आपण परमेश्वराचा विचार करतो. त्यानेच आपल्याला असे वाटते, ही दृष्टी आपल्याला या चक्रामुळे मिळते. आता हे जे चक्र आहे हे फारच महत्त्वपूर्ण आहे.२४/२/१९७९,राहुरी

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### करंजीच्या डोंगरात अनोळखी इसमाचा मृतदेह

करंजी : पाथर्डी तालुक्यातील करंजी घाटाच्या बाजुलाच असलेल्या डोंगराच्या दगडी पारपीटाजवळच एका अज्ञात इसमाचे प्रेत आढळुन आल्याने खळबळ उडाली आहे. तर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. डोंगरात मोठ्या प्रमाणात झालेल्या झाडी व निर्मनुष्य होत असलेले डोंगर याचा उपयोग गुन्हेगार करीत असल्याची चर्चा नागरिकातुन होत आहे.

नगर ते पाथर्डी महामार्गावरील करंजी घाटावरील हनुमान मंदिराजवळुन एक रस्ता डोंगराकडे जातो, डोंगरावर बीएसएनएलचे टॉवर आहे त्या टॉवरपासुन जवळच डोंगराच्या पारपीटाच्याजवळ आज सकाळीच एका अज्ञात इसमाचे प्रेत आढळुन आले. या इसमाचे वय अंदाजे ४० वर्षाच्या आसपास असावे. अंगात फक्त अंडरवेअर असलेल्या अनोळखी इसमाच्या अंगावर कोणत्याही जखमा आढळुन आल्या नाहीत. हा अनोळखी मृतदेह पोलिसांनी पंचनामा करुन उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# रायगड-पुणे-नाशिक घाटमाथ्याला रेड अलर्ट

## पावसाचा जोर वाढणार : पुढील २४ तास अतिधोक्याचे



**मुंबईत चौथा बळी!**

**मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि वेगवान वाऱ्यामुळे कुर्ला (पश्चिम) परिसरात झाड पडून पुन्हा एकदा निष्पाप मुंबईकराला आपला प्राण गमवावा लागला. कुर्ल्याच्या नौपाडा परिसरात सकाळच्या सुमारास झाडाची फांदी डोक्यात पडल्याने ६३ वर्षीय युनुस कुंदावाला यांचा दुर्दैवी मृत्य झाला. (पान ४ वर)**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर लक्षणीयरीत्या वाढला असून अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुंबई, ठाणे, कोकण, रायगड, पुणे, नाशिक घाटमाथा, विदर्भ आणि मराठवाड्यात विविध ठिकाणी मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने पुढील २४ तास अत्यंत महत्त्वाचे असल्याचा इशारा दिला आहे.

हवामान विभागाने रायगड तसेच पुणे-नाशिक घाटमाथ्यासाठी रेड अलर्ट, तर मुंबई आणि संपूर्ण कोकण किनारपट्टीसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील काही जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला असून मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून खेड तालुक्यातील नारंगी नदीलाही पूर आला आहे. अनेक गावांतील भातशेती पाण्याखाली गेली असून नदीकाठावरील स्मशानभूमी आणि वीटभट्ट्यांमध्येही पाणी शिरले आहे. प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि गरज पडल्यास सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याचे आवाहन केले आहे. विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील **पान ४ वर)**

### भिंत कोसळून १८ वाहनांचे नुकसान

पुण्यात गेल्या चार दिवसांपासून सलग पाऊस सुरू आहे. संततधार पावसामुळे कात्रजमधील जांभुळवाडी परिसरातील समृद्धी लेक सोसायटीची सीमाभिंत रविवारी (ता. ५) पहाटे अचानक कोसळली. ही भिंत थेट पार्किंग शेडवर कोसळल्याने नऊ मोटारी आणि नऊ दुचाकींचे मोठे नुकसान झाले. कसबा पेठेतील गावकोस मारुती मंदिर रस्ता येथे झाड कोसळल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. याशिवाय, जुन्या मुंबई-पुणे रस्त्यावरील वाकडेवाडी येथील अंडी उबवणी केंद्राजवळ रविवारी दुपारी झाड कोसळले. कात्रज परिसरातील तलावालगत असलेल्या कठड्यावरून खाली कोसळल्याने ४५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला.

### पालीचा श्री बल्लाळेश्वर पुराच्या पाण्यात

अष्टविनायकांपैकी एक असलेल्या पाली येथील ऐतिहासिक श्री बल्लाळेश्वर देवस्थानच्या मुख्य मंदिरात पुराचे पाणी शिरले. गेल्या काही तासांत झालेल्या ढगफुटीसदृश आणि अतीमुसळधार पावसामुळे पाली शहरासह मंदिर परिसराला पुराच्या पाण्याने वेढले. रायगडमधील सुधागड तालुक्यात शनिवारी रात्रीपासूनच मुसळधार पावसाची संततधार सुरू आहे.

### मुंबई गोवा हायवे दिवसभर ठप्प

मुंबईसह कोकणमध्ये जोरदार पाऊस बरसत आहे. या मुसळधार पावसामुळं अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले. मुसळधार पावसामुळं मुंबई गोवा महामार्गावरील सुकेळी खिंड परिसरातील जिंदाल कंपनीजवळ साचलेल्या पुराच्या पाण्यामुळे वाहतूक देखील दिवसभर ठप्प होती. अनेक वाहने पूर परिस्थितीमुळे मुंबई गोवा महामार्गावर अडकली.

## देशभरातील ५८ इंजीनियरिंग महाविद्यालये बंद!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** देशभरातील तब्बल ५८ इंजिनिअरिंग आणि तंत्रशिक्षण महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय 'ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन'ने ('एआयसीटीई') घेतला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, महाविद्यालय बंद होण्याच्या या यादीत महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश दोघेही अव्वल स्थानी आहेत.

### महाराष्ट्र आणि युपीमध्ये सर्वाधिक फटका

बंद झालेल्या ५८ संस्थांमध्ये खाजगी महाविद्यालयांची संख्या सर्वाधिक आहे. एकूण संस्थांपैकी फक्त ३ सरकारी अनुदानित आहेत, तर बाकी सर्व खाजगी आहेत. राज्यांचा विचार केला तर महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश मध्ये प्रत्येकी १२ महाविद्यालये बंद करण्यात आली आहेत. मध्य प्रदेशमध्ये ८ महाविद्यालये, तेलंगणा आणि पंजाब मध्ये प्रत्येकी ४ महाविद्यालये आंध्र प्रदेश आणि राजस्थान मध्ये प्रत्येकी ३ महाविद्यालये, गुजरात आणि कर्नाटक मध्ये प्रत्येकी २ महाविद्यालये याशिवाय पुणे, तामिळनाडू, हरियाणा, ओडिशा, उत्तराखंड आणि पश्चिम बंगालमध्ये प्रत्येकी १ कॉलेज बंद झाले आहे.

'एआयसीटीई'ने दिलेल्या माहितीनुसार, या ५८ महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून 'प्रोग्रेसिव्ह क्लोजर' म्हणजेच टप्प्याटप्प्याने बंद करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. याशिवाय, विविध कॉलेजेस मधील तब्बल ९५० पेक्षा जास्त अभ्यासक्रम देखील कायमचे बंद करण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असले, तरी घाबरण्याचे कारण नाही. 'एआयसीटीई'ने स्पष्ट केले आहे की, ज्या कॉलेजना 'प्रोग्रेसिव्ह क्लोजर' मंजूर झाले आहे, त्यांना यावर्षीपासून पहिल्या वर्षासाठी नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार नाही. मात्र, जे विद्यार्थी आधीपासूनच तिथे शिकत आहेत, त्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याची पूर्ण परवानगी असेल. त्यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घेतली जाईल. एआयसीटीई ही देशातील तंत्रशिक्षणाचे नियमन करणारी सर्वोच्च संस्था आहे. महाविद्यालय बंद करण्यामागे काही समोर आली. अनेक कॉलेजेसमध्ये गेल्या काही वर्षांत **(पान ४ वर)**

## आढळगावजवळ मध्यरात्री भीषण अपघात;

# कार-पिक अपची समोरासमोर धडक, मोठी जीवितहानी टळली

### कारचा चक्काचूर, पिकअप पलटी; तिघे जखमी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा-जामखेड राष्ट्रीय महामार्गावरील आढळगाव परिसरात शुक्रवारी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास भरधाव कार आणि पिकअप यांच्यात भीषण धडक होऊन दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अपघाताची तीव्रता इतकी भीषण होती की कारचा चक्काचूर झाला, तर पिकअप रस्त्यावर पलटी झाला. सुदैवाने या भीषण अपघातात मोठी जीवितहानी टळली असून कारचालकासह तिघेजण किरकोळ जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, एमएच १६ सीवाय ५५२९ क्रमांकाची कार श्रीगोंद्याकडून जामखेडच्या दिशेने जात होती. त्याचवेळी जामखेडकडून श्रीगोंद्याच्या दिशेने येणाऱ्या एमएच १२ झेडई ३००३ क्रमांकाच्या पिकअपशी तिची समोरासमोर जोरदार धडक झाली.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, कारचालकाने अचानक लेन बदलल्याने हा अपघात घडल्याची चर्चा घटनास्थळी होती. मात्र, अपघाताचे नेमके कारण अधिकृत तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.अपघात होताच मोठा आवाज झाल्याने परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. त्यांनी तत्काळ जखमींना बाहेर काढून मदत केली. जखमींना उपचारासाठी रवाना करण्यात आले.

दरम्यान, या भीषण अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. या अपघातानंतर रस्त्याच्या दोन्हीही बाजूने वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. परिसरातील नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन वाहतूक सुरळीत केल्याने वाहतूक कोंडी सुटली.रात्री उशिराने या अपघात प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## श्रीरामपूर हादरले !

# सलग दुसऱ्यादिवशी प्राणघातक हल्ला; श्रीरामपूरातील मिनी स्टेडियमवर बोलावून दोन युवकांवर चाकूने वार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर –** शहरातील गुन्हेगारीचे सत्र थांब नाव घेताना दिसत नाही. शहरातील पूर्णवादनगर येथे एका १९ वर्षीय युवकावर झालेल्या गोळीबाराची घटना ताजी असतानाच, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ३ जुलै रोजी रात्री पुन्हा एकदा दोन युवकांवर प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या सलगच्या घटनांमुळे शहरवासीय पुरते हादरून गेले असून परिसरात भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी, ३ जुलै रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास शहरातील मध्यवर्ती आणि गजबजलेल्या कर्मवीर चौकाशेजारी असलेल्या मिनी स्टेडियम येथे ही घटना घडली. अज्ञात ४ ते ५ जणांच्या टोळीने सोहेल मेमन आणि वसीम मेमन या दोन युवकांना तेथे बोलावून घेतले. त्यानंतर कोणत्याही कारणावरून हा वाद घालत टोळीने या दोघांवर धारदार शस्त्राने जीवघेणा हल्ला केला. हा हल्ला अत्यंत भीषण होता. हल्ला करणाऱ्या टोळीने सोहेल मेमन याच्या पोटात थेट चाकू खुपसला, ज्यामध्ये तो गंभीर जखमी झाला आहे. तसेच त्याचा साथीदार वसीम मेमन हा देखील या हल्ल्यात गंभीर जखमी झाला आहे. दोन्ही जखमी युवकांना तातडीने लोणी येथील प्रवरा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सोहेल मेमन याची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची **(पान ४ वर)**

**■ या हल्ल्यामागील मुख्य कारण अद्याप समोर येऊ शकलेले नाही. आता श्रीरामपूर पोलीस प्रशासन शहरातील या वाढत्या गुन्हेगारीला लगाम घालण्यासाठी कोणती कडक पावले उचलणार आणि आरोपींना कधी बेड्या ठोकणार, याकडे सर्वसामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.**

## 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स'वरून वाद

### रुपाली चाकणकरांकडून दिपाली सय्यद यांना २५ कोटींची नोटीस

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**मुंबई :** कथित भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर आधारित असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स' या आगामी चित्रपटावरून नवा वाद निर्माण झाला आहे. चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाल्यानंतर अभिनेत्री दिपाली सय्यद यांनी साकारलेले पात्र महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याशी साधर्म्य असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्यानंतर कायदेशीर **(पान ४ वर)**



## चिंचोली-कोल्हार खुर्द येथील पाणी साठवण तलावात बुडून तरुणाचा मृत्यू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार :** राहुरी तालुक्यातील चिंचोली-कोल्हार खुर्द येथील पिण्याच्या पाणी योजनेच्या साठवण तलावात पोहण्यासाठी गेलेल्या एका तरुणाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कैलास रामदास ठाकरे (वय ३४, रा. पाटीलवाडी, कोल्हार खुर्द) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण चिंचोली, पाटीलवाडी आणि कोल्हार खुर्द परिसरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी कैलास ठाकरे हा त्याच्या मित्रांसोबत तलावाच्या काठावर गेला होता. तलावात पोहत असताना अचानक पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे तो खोल पाण्यात ओढला गेला आणि बुडाला. या घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली आणि नागरिकांनी तलावाकडे धाव घेतली. घटनेचे गांभीर्य ओळखून शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी निखिल भोसले यांनी तातडीने अग्निशमन दल, आपत्कालीन विभाग आणि राहुरी पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. शनिवारी सायंकाळी तात्काळ शोधमोहीम सुरू करण्यात आली, मात्र रात्रीचा अंधार पडल्यामुळे ही मोहीम तात्पुरती थांबवावी लागली होती.

रविवार सकाळी पुन्हा एकदा राहुरी, श्रीरामपूर आणि देवळाली प्रवरा येथील प्रशासकीय यंत्रणेच्या संयुक्त पथकाने मोठ्या प्रमाणावर 'रेस्क्यू ऑपरेशन' हाती घेतले. काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर, कैलास ठाकरे यांचा मृतदेह तलावाच्या खोल पाण्यात दगडांमध्ये अडकलेल्या अवस्थेत आढळून आला. **(पान ४ वर)**

# वाळू माफियांवर एलसीबीची मोठी कारवाई

## श्रीरामपूर व नेवासा परिसरातून २४ लाखांचा मुद्देमाल जप्त!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध धंद्यांचे प्रमाण वाढले असून, या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासन पूर्णपणे 'ॲक्शन मोड'वर आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने श्रीरामपूर आणि नेवासा तालुक्यात अवैध वाळू वाहतूक व उपसा करणाऱ्यांवर धडक छापे टाकले आहेत. या धडक कारवाईत एकूण २४ लाख ३० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली दोन विशेष पथके तयार करून ही कारवाई करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक संदिप दरवडे यांच्या पथकाने नेवासा येथील पावन गणपती मंदिराजवळ अचानक छापा टाकला. या ठिकाणी अवैध वाळू वाहतूक करताना गंगानगर (ता.नेवासा) येथील सागर माळी यास पोलिसांनी ताब्यात घेतले, तर त्याचा साथीदार नामदेव कुसळकर हा पोलिसांची चाहूल लागताच पसार होण्यात यशस्वी झाला. त्यांच्याकडून ३ ब्रास शासकीय वाळू आणि विना क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा डंपर, १५ लाख ३० हजार रुपये असा एकूण मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून एका फरार आरोपीचा शोध सुरू आहे.सदरची धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशान्वये आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

पोलीस उपनिरीक्षक संदिप दरवडे, पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव, पोलीस अंमलदार बाळासाहेब नागरगोजे, गणेश लोंढे, बाळासाहेब गुंजाळ, किशोर शिरसाठ, योगेश कर्डीले, रिर्चर्ड गायकवाड, शामसुंदर जाधव, भगवान थोरात आणि रमिझराजा आतार आदीनी कारवाई केली असून एलसीबीच्या या लागोपाठ केलेल्या धडक कारवायांमुळे जिल्ह्यातील वाळू माफियांचे धाबे दणाणले असून, अवैध धंदे करणाऱ्यांना पोलिसांचा कडक इशारा मिळाला आहे.

### दुसरी कारवाई: खानापूर येथील गोदावरी नदीपात्रात छापे; दोन ट्रॅक्टर जप्त

दुसरी कारवाईत पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव यांच्या पथकाने श्रीरामपूर तालुक्यातील खानापूर येथील गोदावरी नदीपात्रात केली. नदीपात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा सुरू असताना पोलिसांनी छापा टाकला. पोलिसांची गाडी पाहताच वाळू उपसा करणारे अज्ञात चालक वाळूसह ट्रॅक्टर सोडून पळून गेले. 'सोन्यालिका' आणि 'जॉन डिअर' कंपनीचे दोन ट्रॅक्टर, किंमत ९ लाख रुपये पोलिसांनी ट्रॅक्टर जप्त केले असून, अज्ञात चालकांविरुद्ध श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





# माहिती अधिकारावर टांगती तलवार




लोकशाही ही केवळ निवडणुकांवर उभी नसते; ती पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांच्या सहभागावर टिकून असते. शासनाच्या प्रत्येक निर्णयावर प्रश्न विचारण्याचा आणि सार्वजनिक माहिती मिळवण्याचा अधिकार हा लोकशाहीचा आत्मा आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार हा केवळ एक कायदा नसून सामान्य नागरिकाच्या हातातील सर्वात प्रभावी लोकशाहीचे शस्त्र आहे. गेल्या दोन दशकांत या कायद्यामुळे असंख्य घोटाळे उघडकीस आले, प्रशासनातील भ्रष्टाचारावर अंकुश बसला आणि सरकारी यंत्रणेला उत्तरदायी राहण्यास भाग पाडले गेले. त्यामुळेच या कायद्याला कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न हा थेट लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारा ठरतो.

राज्य शासनाने १२ जून २०२६ रोजी लागू केलेली नवीन माहिती अधिकार नियमावली याच कारणामुळे तीव्र वादाच्या भोवऱ्यात सापडली. नागरिक, माहिती अधिकार कार्यकर्ते आणि कायदेतज्ज्ञांनी या नियमावलीवर गंभीर आक्षेप घेतले. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी तर या नियमावलीला ''माहिती अधिकार कायद्याची दशक्रिया'' असे संबोधत आमरण उपोषणाची घोषणा केली. राज्यभरातून वाढलेल्या जनदबावानंतर सरकारने ही नियमावली तात्पुरती स्थगित केली असली, तरी ती पूर्णपणे रद्द केलेली नाही. त्यामुळे लोकशाहीवरील धोका अद्याप टळलेला नाही.या नियमावलीतील सर्वात वादग्रस्त बाब म्हणजे माहिती अर्जाच्या शुल्कात करण्यात आलेली दहापट वाढ. शासनाने वाढत्या प्रशासकीय खर्चाचे कारण पुढे केले असले, तरी महागाईचा सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांनाच बसत आहे. अशा परिस्थितीत माहिती मागण्याचा आर्थिक भारही नागरिकांवर टाकणे हे माहितीच्या अधिकाराला आर्थिक अडथळे निर्माण करणारे पाऊल ठरते. विशेष म्हणजे माहिती देण्यास विलंब करणाऱ्या किंवा माहिती दडवणाऱ्या अधिकाऱ्यांवरील दंड मात्र दोन दशकांपासून वाढविण्यात आलेला नाही. नागरिकांवर निर्बंध आणि अधिकाऱ्यांना मोकळीक, हा विरोधाभास गंभीर आहे.

नवीन नियमावलीतील दुसरा आक्षेप म्हणजे भारतीय नागरिकत्व सिद्ध करणारे कागदपत्र जोडण्याची सक्ती. आधार, पॅन, मतदार ओळखपत्र किंवा पासपोर्टही नागरिकत्वाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जात नसल्याने नागरिकांनी नेमके कोणते कागदपत्र सादर करावे, हा मूलभूत प्रश्न निर्माण होतो. बहुसंख्य भारतीयांकडे स्वतंत्र नागरिकत्व प्रमाणपत्र नसते. त्यामुळे ही अट व्यवहार्य नसून माहिती मिळविण्याचा घटनात्मक अधिकारच कठीण करणारी ठरते.याचबरोबर एका विषयावर एकच अर्ज करण्याची मर्यादा घालण्यात आली आहे. काही व्यक्ती कायद्याचा गैरवापर करतात म्हणून सर्व नागरिकांवर निर्बंध लादणे हे लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी विसंगत आहे. कायद्याचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करणे हा उपाय असताना प्रामाणिक नागरिकांनाच संशयाच्या भोवऱ्यात उभे करणे योग्य ठरू शकत नाही.अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या चर्चेत शासनाच्या भूमिकेतील अनेक विसंगती उघड झाल्या. माहिती आयोगाच्या आकडेवारीनुसार हजारो अपिलांपैकी अत्यल्प प्रकरणांतच अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होते. अनेक अधिकारी वेळेत माहिती देत नाहीत, प्रथम अपिलीय अधिकारी निर्णय घेत नाहीत, सुनावणीला अनुपस्थित राहतात, तरी त्यांच्यावर प्रभावी शिस्तभंगाची कारवाई होत नाही. भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या या त्रुटी दूर करण्याऐवजी नागरिकांवरच नवीन निर्बंध लादण्याचा प्रयत्न का, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे ही नियमावली तयार करण्याची प्रक्रिया. माहिती अधिकार कार्यकर्ते, विधिज्ञ, पत्रकार, सामाजिक संघटना किंवा सामान्य नागरिक यांच्याशी व्यापक चर्चा न करता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत नियमावली तयार करण्यात आली. पारदर्शकतेसाठी असलेल्या कायद्यालाच अपारदर्शक पद्धतीने कमकुवत करण्याचा हा प्रयत्न असल्याची टीका त्यामुळे होत आहे.माहितीचा अधिकार हा केवळ कागदपत्रे मिळविण्याचा अधिकार नाही; तो भ्रष्टाचाराविरुद्धची लोकशाहीतील सर्वात प्रभावी यंत्रणा आहे. अनेक मोठे घोटाळे, बेकायदेशीर नियुक्त्या, निधीतील गैरव्यवहार आणि प्रशासनातील अनियमितता याच कायद्यामुळे उघडकीस आल्या. त्यामुळे हा अधिकार निष्प्रभ झाला तर त्याचा सर्वाधिक फायदा अपारदर्शक आणि भ्रष्ट व्यवस्थेलाच होईल.या प्रकरणात विरोधी पक्षांचीदेखील भूमिका समाधानकारक दिसली नाही. सत्ताधारी आणि विरोधक हे बदलत असतात; परंतु माहिती अधिकाराचा प्रभाव कमी झाला तर त्याचा परिणाम संपूर्ण लोकशाही व्यवस्थेवर होतो. त्यामुळे हा विषय पक्षीय राजकारणाचा नसून लोकशाहीच्या अस्तित्वाचा आहे.

सरकारने नियमावलीला स्थगिती दिली असली तरी हा अंतिम विजय नाही. अण्णा हजारे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे शासनाने अद्याप दिलेली नाहीत. नियमावली कायमची मागे घेऊन नागरिक, तज्ज्ञ, माहिती अधिकार कार्यकर्ते आणि पत्रकार यांच्याशी सविस्तर चर्चा करूनच नव्या तरतुदी तयार करणे हीच लोकशाहीस साजेशी भूमिका ठरेल.माहितीचा अधिकार हा शासनाने दिलेला उपकार नसून संविधानातून नागरिकांना प्राप्त झालेला लोकशाहीचा अधिकार आहे. या अधिकारावर कोणतेही अनावश्यक निर्बंध स्वीकारले गेले तर उद्या पारदर्शक प्रशासनाची अपेक्षा ठेवण्याचा नैतिक अधिकार समाज गमावेल. म्हणूनच माहिती अधिकार वाचविण्याचा संघर्ष हा केवळ काही कार्यकर्त्यांचा नसून प्रत्येक जागरूक नागरिकाचा आहे. लोकशाही मजबूत ठेवायची असेल तर माहितीचा अधिकार अधिक सक्षम करणे आवश्यक आहे; कमकुवत करणे नव्हे. कारण माहितीचा दिवा विझला, तर लोकशाहीचा मार्गही अंधारात जाईल.

# सुरेगावात गांजाची लागवड करणाऱ्यावर पोलिसांचा छापा

## २.७ लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** -ग्रामीण भागात अमली पदार्थाच्या लागवडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने गस्त, माहिती संकलन आणि विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. यूवकांचे भविष्य उद्धवस्त करणाऱ्या अमली पदार्थांच्या साखळीवर प्रहार करण्याच्या दृष्टीने अशा कारवाप्या निर्णायक ठरत असताना अमली पदार्थांच्या वाढत्या विळव्याविरोधात कोपरगाव तालुका पोलिसांनी पुन्हा एकदा प्रभावी कारवाई करत सुरेगाव येथे गांजाच्या झाडांची लागवड उघडकीस आणली. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत २ लाख ७ हजार ७५० रुपयांचा गांजाचा मुद्देमाल सांगितले.या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या गांजाच्या झाडांची किंमत सुमारे २ लाख ७ हजार ७५० रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. अमली पदार्थींच्या निर्मिती व तस्करीला आळा घालण्यासाठी ही कारवाई महत्वपूर्ण मानली जात आहे.याप्रकरणी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २८५/२०२६ दाखल करण्यात आला असून, आरोपीविरुद्ध अमली पदार्थ आणि मनोव्यापतचवर परिणाम करणारे पदार्थ कायदा (छूझड अलीं) अंतर्गत कलम ८ (क), २० (ब) (खख) (क) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.



जप्त करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली असल्याची माहिती कोपरगाव तालुका ग्रामीणचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी दिली

सविस्तर वृत्त असे की कोपरगाव तालुक्यातील गोदावरी नदीच्या लगत असलेल्या सुरेगाव गावठाण परिसरात एका व्यक्तीकडून घराशेजारील मोकळ्या जागेत गांजाची लागवड केली जात असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीची शाहनिशा करण्यासाठी पोलिसांनी तत्काळ पथकासह संबंधित ठिकाणी टाकली.छाप्यादरम्यान संजय महिमत रजपूत (वय ४५, रा. सुरेगाव, ता. कोपरगाव) यांच्या ताब्यातील जागेत गांजाची झाडे आढळून आली. पोलिसांना पाहताच आरोपीने पसार होण्याचा प्रयत्न केला; मात्र सतर्क पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. चौकशीत संबंधित जागा व गांजाची लागवड स्वतः ची असल्याची कबुली आरोपीने दिल्याचे पोलिसांनी

दर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे तसेच, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली असून या पथकामध्ये नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे , कोपरगाव तालुका पोलिस पाटील संघटनेचे अध्यक्ष इंद्रभान ढोमसे, पोलीस पाटील कांचन दिपक राऊत,पोलिस हेड कॉन्स्टेबल मधुसूदन दहिफळे, पो.ना.रघुनाथ कारखिले, पोकों अंबादास वाघ, पोकों जयदीप गवारे, पोकों राम खारतोडे, पोकों अविनाश तमनर, पोकों रशिद शेख, पोकों प्रकाश नवाली व पोकों युवराज खुळे सुरेगावचे कोतवाल संदीप शहाणे यांचा सहभाग होता.अमली पदार्थाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्याचा पोलिसांचा निर्धार या कारवाईतून पुन्हा अधोरेखित झाला आहे.

# बेलपिंपळगावच्या गायत्री चौगुले हिचे एलएलबी परीक्षेत घवघवीत यश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान** : नेवासा तालुक्यातील बेलपिंपळगाव येथील कु.गायत्री बंडोपंत चौगुले हिने एलएलबी परीक्षेत 'ए' ग्रेड मिळवून घवघवीत यश संपादन केले आहेत. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे, अहिल्यानगरचे प्रभारी व प्रवक्ते प्रा. कार्लस साठे, जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, जिल्हा उपाध्यक्ष हरियाप्पा तुवर, संपर्कप्रमुख साहेबराव चोरमल, आणि नेवासा तालुकाध्यक्ष मेजर अशोक काळे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गायत्रीचे प्रत्यक्ष अभिनंदन केले. तसेच, युवा तालुकाध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी, प्राचार्य बी. डी. शिंदे, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष युवराज जगताप, शिर्डी काँग्रेसचे शहराध्यक्ष प्रा. रमेश सरोदे, ज्येष्ठ शेतकरी नेते खंडेराव सरोदे, वसंतराव शेरकर यांच्यासह परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी तिच्या या यशाचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. गायत्रीच्या या यशामुळे बेलपिंपळगाव परिसराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# एसटीचा 'डिजिटल युगारंभ'

## कार्ड वाटप शिबिरात जादा शुल्क आकारल्याचा ग्रामस्थांचा आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : राहुरी व संपूर्ण जिल्ह्यातील तालुक्यामधील बसने प्रवास करणाऱ्या नागरिकांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांसाठी सुरू करण्यात आलेल्या 'डिजिटल युगारंभ' (छउचउ) कार्ड वाटप मोहिमेअंतर्गत राहुरी तालुक्यातील विविध गावांमध्ये शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, दिव्यांग, पत्रकार तसेच इतर प्रवाशांसाठी हे कार्ड महत्त्वाचे असल्याने मोठ्या प्रमाणावर नागरिक प्रतिसाद देत आहेत.

मात्र, म्हैसगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, नवीन कार्डासाठी शासनाने १९९ रुपये आणि जुन्या कार्डाच्या नूतनीकरणासाठी १४९ रुपये शुल्क निश्चित केले असताना, शिबिरात अनेक प्रवाशांकडून ३०० रुपये घेतले जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

याबाबत नागरिकांनी शिबिरातील प्रतिनिधींना विचारणा केली



असता समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचा दावा करण्यात आला आहे. शुल्काबाबत प्रश्न उपस्थित होताच शिबिर बंद करण्यात आल्याचेही काही ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

शिबिराच्या ठिकाणी 'डिजिटल युगारंभ' कार्डाचे पोस्टर तसेच विविध राजकीय नेत्यांचे फोटो असलेले बॅनर लावण्यात आल्याचेही नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. शासनाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारली जात असल्यास संबंधित प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.दरम्यान, या प्रकरणाबाबत संबंधित यंत्रणा किंवा शिबिर आयोजकांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या आरोपांची सत्यता पडताळून योग्य ती कारवाई करण्याची अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# संजीवनी इंजिनिअरींगच्या अठरा विध्यार्थ्यांना टीसीएस मध्ये नोकरीची संधी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगांव** : संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या एकाचवेळी अठरा विध्यार्थ्यांना टिसीएस या नामांकित कंपनीत चांगल्या पगाराच्या नोकरीची संधी मिळाली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबध्द प्रयत्नामुळे विध्यार्थ्यांना ही उत्तम संधी मिळाली. या विध्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परिक्षेचा निकाल जाहिर होण्यापूर्वीच त्यांच्या हाती नोकरीची ऑर्डर मिळाली. त्यामुळे हे विद्यार्थी आणि त्यांचे पालक सुखावून गेले. संजीवनीत प्रवेश म्हणजे उत्तम करिअर घडण्याची हमी हे समिकरण यंदाही कायम आहे. अशा प्रकारे विध्यार्थ्यांच्या करीअरसाठी संजीवनीची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

या अठरा विद्यार्थ्यांत कॉम्प्युटर इंजिनिअरीगच्या पाच, इन्फर्मेशन टेक्नालॉजी विभागाच्या सात व इलेक्ट्रॉनिक्स अँड कॉम्प्युटर इंजिनिअरींग विभागाच्या सहा विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने या विद्यार्थ्यांची जडणघडण करण्यात महत्वाची भूमिका बजावली. त्याचवेळी नामांकित कंपन्या हवे असलेले कुशल अभियंते घडवीण्यासाठी नेमके काय करायला हवे याची रूपरेषा तयार केली. त्यानुसार विद्यार्थ्यांची तयारी करवून घेतली जात असल्याने संजीवनीच्या विध्यार्थ्यांना विविध कंपन्यांत प्राधान्याने संधी मिळते आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रविण रामकिसन थोरवे, समृध्दी अशोक त्रिभान, विरेंद्र रविद्र तरटे, अभय हरीश पेटकर यांना प्रत्येक वार्षिक पॅकेज रू ९ लाख देण्यात आले. अविष्कार मढवई व प्रतिक अरविंद शिरसाठ यांना प्रत्येकी रू ७.६० लाखांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले. फरहाण पठाण, गोकुळ रक्ताटे ,आकांक्षा बेल्हेकर, साक्षी राजळे, साहिल अशोक थोरात, सोनिया मते, आदित्य राजपुत, तृप्ती शेळके, धनश्री शिरोळे, ईश्वरी योगेश माने, किरण म्हाळसकर व वैष्णवी निकम यांचाही या नोकरीत समावेश आहे.संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी हे विद्यार्थी, त्यांचे पालक तसेच डायरेक्टर डॉ. आर. ए. कापगते आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाची टीमचे अभिनंदन केले.

# श्री मारुती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी प्रसाद गोरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : श्री मारुती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्टच्या अध्यक्षपदी प्रसाद गोरे,. उपाध्यक्षपदी योगेश मेहेर,सचिवपदी संतोष पावबाके, खजिनदारपदी तर किसन गलांडे यांची सर्व सभासदांच्या एकमताने व संमतीने बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. संगमनेर शहरातील माळीवाडा येथील मारुती देवस्थान माळी समाज पंच ट्रस्ट या देवस्थानची वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये २०२६-२०२७ या वर्षासाठी ट्रस्टच्या नवीन कार्य कारणीची बिनविरोध निवड करण्यात आली सभेचे अध्यक्षपद . अमित मंडलिक यांनी भूषविले. ' सावित्रीच्या लेकी प्रतिष्ठानच्या महिला अध्यक्षपदी . जयश्री संजय पुंड, उपाध्यक्षपदी सौ. मिनल संतोष अभंग, सचिवपदी मालती धनंजय डाके यांची निवड करण्यात आली आहे. निवड प्रक्रियेनंतर सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा करण्यात आला. यावेळी माजी अध्यक्ष अमित मंडलिक, उपाध्यक्ष भारत ढोले, सचिव अभिजित (मुन्ना) अरुणशेठ पुंड, खजिनदार अतुल अभंग यांच्या सह समाज बांधव उपस्थित होते.

# मतदार यादी शुद्धीकरण महायज्ञात आ. ओगले सहभागी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : लोकशाहीच्या पायाभूत स्तंभ असलेल्या मतदारयादीच्या पावित्र्यासाठी भारत निवडणूक आयोगाने हाती घेतलेल्या 'विशेष सखोल संक्षिप्त पुनरीक्षण' अर्थात एसआयआर मोहिमेला श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत ओगले यांनी प्रत्यक्ष सहभाग नोंदवून प्रशासकीय यंत्रणेस बळ दिले.

'स्विप' मोहिमेअंतर्गत मतदारांमध्ये एसआयआरबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने श्रीरामपूर विभागाचे प्रांताधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत पाटील यांनी आमदार ओगले यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचे व कुटुंबाचे गणना पत्रक स्वहस्ते भरून घेतले.



यांप्रसंगी प्रांताधिकारी सावंत पाटील यांनी आमदार ओगले यांना एसआयआर मोहिमेची पार्श्वभूमी, उद्दिष्ट्ये व कालमर्यादा यांची सविस्तर माहिती दिली. एकही पात्र मतदार वगळला जाऊ नये आणि एकही अपात्र नाव यादीत प्रवेश करू नये, यासाठीची ही संविधानिक तपश्चर्या आहे.

मतदारयादी त्रुटीविरहित, पारदर्शक व अचूक व्हावी यासाठी राजकीय पक्षांनी नियुक्त केलेल्या बीएलए यांनी केंद्रस्तरावर कार्यरत बीएलओ यांना सहकार्य करावे. लोकप्रतिनिधींनीच या मोहिमेत आघाडी घेतल्यास जनतेमध्ये प्रशासनावरील विश्वास दृढ होतो, असा विश्वास प्रांताधिकारी सावंत पाटील यांनी व्यक्त केला.

या वेळी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष करण ससाणे, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, स्विप नोडल अधिकारी गणेश पिंगळे, संदिप पाळंदे, सिद्धार्थ गवारे, बीएलओ सुजित जाधव, अजय धाकतोडे आदी उपस्थित होते. आमदार ओगले यांच्या पुढाकारामुळे तालुक्यात एसआयआर मोहिमेस नवचैतन्य मिळाले आहे.

# टाकळीभान सेवा संस्थेच्या चेअरमनपदी राहुल पटारे, उपाध्यक्षपदी सुनंदाताई कोकणे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील राजकीयदृष्ट्या प्रतिष्ठेच्या टाकळीभान विविध कार्यकारी सेवा संस्थेच्या चेअरमनपदी राहुल पटारे, तर उपाध्यक्ष (व्हा. चेअरमन) पदी सुनंदाताई कोकणे यांची निवड झाली. सहाय्यक निबंधक रवी गडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात शनिवारी (४ जुलै) ही निवड प्रक्रिया पार पडली.

यासाठी सकाळी ११ वाजता संचालक मंडळाची बैठक झाली. संस्थेच्या १३ संचालकांपैकी ८ संचालक उपस्थित, तर ५ संचालक गैरहजर होते. बहुमत ना. राधाकृष्ण विखे पाटील गटाच्या बाजूने गेल्याने संस्थेवर विखे गटाचे वर्चस्व कायम राहिले. माजी चेअरमन मंजाबापू थोरात व उपाध्यक्ष अविनाश लोखंडे यांनी पदाचे राजीनामे दिल्यानंतर ही निवड करण्यात आली.

चेअरमनपदासाठी राहुल पटारे यांच्या नावाचा प्रस्ताव मंजाबापू थोरात यांनी मांडला. त्यास



एकनाथ पटारे यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी सुनंदाताई कोकणे यांच्या नावाचा प्रस्ताव एकनाथ पटारे यांनी मांडला असून, त्यास अविनाश लोखंडे यांनी अनुमोदन दिले.

निवड प्रक्रिया सहाय्यक निबंधक रवी गडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी सहाय्यक अधिकारी रवी जाधव, सतीश कुदळे, कार्यकारी अधिकारी जगन्नाथ नरसाळे, सचिव कृष्णा शिंदे, कर्मचारी प्रकाश मोरे आदींनी कामकाज पाहिले.

यावेळी माजी सभापती नानासाहेब पवार, लक्ष्मण (भाऊ) थोरात, चित्रसेन रणनवरे, मंजाबापू थोरात, उपसरपंच कान्हा खंडागळे, भाऊसाहेब पवार, अविनाश लोखंडे, एकनाथ पटारे, विजय कोकणे, देवदान रणनवरे, संगीता गायकवाड, आप्पासाहेब रणनवरे, सुधीर मगर, पोपटराव पटारे, भाऊसाहेब पटारे, गोरक्षनाथ कोकणे, बाबासाहेब बोडखे, भाऊ कोकणे, अक्षय कोकणे, मच्छिंद्र पटारे, गोरक्षनाथ खुरूद, अर्जुन भालेराव, पप्पू रणनवरे आदी उपस्थित होते.

**चेअरमन निवडीवर पाच संचालकांची लेखी हरकत**

संस्थेच्या चेअरमनपदी राहुल पटारे यांच्या निवडीपूर्वी पाच संचालकांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी हरकत नोंदविली. रोहीदास बोडखे, नितीन पटारे, पुष्पलता मगर, शिवाजी पवार आणि शांताबाई नाईक यांनी दिलेल्या हरकतीत राहुल पटारे यांनी त्यांच्या नावावरील शेतीची विक्री केल्याने ते सध्या भूमिहीन असल्याचा दावा केला आहे. संस्थेच्या उपविधी क्रमांक ६ मधील १७ (उ) नुसार त्यांचे सभासदत्व रद्द करून त्यांना चेअरमनपदासाठी अपात्र ठरविण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे संस्थेच्या उपविधी तसेच सहकार कायद्याचे उल्लंघन होईल, असा दावा हरकतदारांनी केला आहे. या हरकतीवर निवडणूक अधिकाऱ्यांनी काय निर्णय घेतला, याबाबत मात्र अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही.

# राज्यातील पोलिस दलाला संविधानाचे धडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : भारतीय संविधानाबाबत पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये अधिक जागरूकता निर्माण करण्यासाठी राज्य पोलिस विभागाने व्यापक स्तरावर संविधान प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदर्भात राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यभरातील विविध पोलिस यंत्रणांमध्ये कार्यशाळा घेण्यास मंजुरी देण्यात आली. असल्याची माहिती मुख्य संविधान व्याख्याते तुषार पगारे यांनी दिली.

प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की राष्ट्रीय संविधान मंचच्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये या उपक्रमांतर्गत राज्यातील १२ पोलिस आयुक्तालये, ३४ पोलिस अधीक्षक कार्यालये, १० पोलिस प्रशिक्षण केंद्रे, महाराष्ट्र पोलिस ॲकॅडमी, १५० पोलिस उपविभागीय कार्यालये, तसेच ३५८ तालुका पोलिस ठाण्यांमध्ये संविधान प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानातील मूलभूत तत्त्वे,

अधिकार, कर्तव्ये आणि लोकशाही मूल्यांची सखोल माहिती देण्यात येईल. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार, नागरिकांची कर्तव्ये, कायद्याचे राज्य आणि संविधानिक मूल्यांचा दैनंदिन कामकाजात प्रभावी वापर व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. प्रशिक्षणामुळे कायदा व सुव्यवस्था



राखताना संविधाननिष्ठ आणि नागरिकाभिमुख दृष्टिकोन अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.मुख्य संविधान व्याख्याते पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळांचे नियोजन करण्यात आले असून, राज्यभरात टप्प्याटप्प्याने त्यांची अंमलबजावणी केली जाईल. पोलिस महासंचालक दाते यांनी या उपक्रमासाठी विशेष पुढाकार घेतला असून, संविधान जनजागृतीसाठीचा हा उपक्रम देशातील पोलिस दलासाठी आदर्श ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# द•ख•ल

## निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा संघटकपदी अर्जुन राऊत



**टाकळीभान** : निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ महाराष्ट्र राज्य अहिल्यानगर जिल्हा संघटकपदी टाकळीभान ता.श्रीरामपूर येथील सामाजिक कार्यकर्ते पत्रकार अर्जुन भाऊसाहेब राऊत यांची निवड करण्यात आली. नुकतेच निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद दादा मोरे, अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब डोंगरे सर यांच्या कडून त्यांना निवड पत्र प्राप्त झाले आहे. राऊत यांनी केलेले पर्यावरण संदर्भात जनजागृती, वृक्ष संवर्धन, वृक्षारोपण, पर्यावरण संदर्भात राबविलेले विविध सामाजिक उपक्रम,आदी कार्याची दखल घेऊन त्यांची निवड करण्यात आली आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोद मोरे, राज्य उपाध्यक्ष प्रा. डॉ. अनिल लोखंडे, प्रकाश केदारी , तुकाराम अडसूळ, जिल्हा कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, लतिका पवार,जिल्हाध्यक्ष बाळासाहेब डोंगरे, पर्यावरण मंडळाचे पदाधिकारी आदी सह टाकळीभान ग्रामस्थ, पदाधिकारी व पर्यावरण प्रेमी यांनी राऊत यांचे अभिनंदन केले आहे.

## पुणतांबा येथे शिवसेनेच्या वतीने महाआरती अयोध्या मंदिर गैरव्यवहाराचा निषेध



**पुणतांबा** : अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिर दानपेटीतील कथित २,५०० कोटींचा गैरव्यवहार आणि शिवसेनेने अर्पण केलेली चार किलो चांदीची वीट गायब झाल्याच्या निषेधार्थ, उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार राहाता तालुक्यातील पुणतांब्यात शिवसेनेने जाहीर निषेध केला. कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पुणतांबा येथील गोदावरी नदीच्या ब्राह्मण घाटावरील शनि मंदिरात शिवसेना शहरप्रमुख महेश कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. पुरोहित विवेक जोशी यांच्या उपस्थितीत मंत्रोपचारात विधिवत पूजन करून हा निषेध नोंदवला. या शांततापूर्ण आंदोलनात वाल्मिक कुलकर्णी, संदीप पऱ्हे, किरण जगदाळे, बाळासाहेब पवार, रघुनाथ सोनवणे, केशव जाधव यांच्यासह अनेक ज्येष्ठ नागरिक, शिवसैनिक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पत्रकार सोमनाथ डोळे यांना राज्यस्तरीय ‘समाजभूषण पुरस्कार’




**झरेकाठी** : समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याच्या परंपरेनुसार, सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा राज्यस्तरीय समाजभूषण सन्मान २०२६ संगमनेरचे पत्रकार सोमनाथ डोळे यांना प्रदान करण्यात आला. या वृत्तपत्रांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत आहेत. त्यांच्या याच सामाजिक धडपडीची दखल घेत निवड समितीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. हा भव्य सोहळा रविवारी, ५ जुलै रोजी अहिल्यानगर येथील माऊली संकुल सभागृहात पार पडला. सरपंच सेवा संघाचे संस्थापक बाबासाहेब पावसे यांच्या नेतृत्वाखाली, शिवसेना नेते व सौंदाळा सरपंच शरद आरगडे यांच्या हस्ते डोळे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष रोहित संजय पवार, यादवराव पावसे व इतर उपस्थित होते. डोळे यांच्या या यशाबद्दल राज्यातील सरपंच बांधवांनी व सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# साहेबराव घाडगे पाटील यांच्या प्रथम स्मृतिदिनी तेलकुडगावात हजारो चाहत्यांची उपस्थिती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे संस्थापक, शिक्षणमहर्षी स्वर्गीय मेजर साहेबराव घाडगे पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त रविवारी त्यांच्या जन्मगाव तेलकुडगाव येथे भावपूर्ण स्मृतिसोहळा पार पडला. राज्याच्या विविध भागांतून आलेल्या हजारो नागरिक, माजी विद्यार्थी, मान्यवर व ग्रामस्थांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. सकाळच्या सत्रात वाणीभूषण समाधान महाराज शर्मा यांच्या कीर्तनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.




आदरांजली कार्यक्रमात आमदार विठ्ठलराव लंघे पाटील म्हणाले, साहेबराव घाडगे पाटील हे जिद्द, दूरदृष्टी आणि शिक्षणाची तळमळ असलेले व्यक्तिमत्त्व होते. शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे, या ध्येयातून त्यांनी त्रिमूर्ती शैक्षणिक संकुल उभे केले. त्यांचे विचार पुढे नेण्याची जबाबदारी आता सर्वांची आहे. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या पत्नी व माजी सभापती सुनीताताई गडाख यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. पंचगंगा उद्योग समूहाचे प्रमुख प्रभाकरकाका शिंदे पाटील यांनीही साहेबराव घाडगे पाटील यांच्या प्रेरणादायी कार्याची आठवण सांगत त्यांची परंपरा पुढे सुरू ठेवण्याचे आवाहन केले.

त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा अॅड. सुमतीताई घाडगे पाटील म्हणाल्या, साहेबांनी रुजवलेले विचार हीच त्रिमूर्तीची खरी प्रेरणा आहे. बहुजन समाजातील मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, यासाठी त्यांनी आयुष्य वाहिले. त्यांच्या जाण्यानंतर पोरकेपणाची भावना होती; मात्र त्यांचे विचार आम्हाला सतत बळ देत आहेत. बोलताना त्या भावूक झाल्या. यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ अॅड. देसाई देशमुख, रामायणाचार्य हभप ज्ञानेश्वर महाराज तांबे, नानासाहेब फाटके यांनी साहेबराव घाडगे पाटील यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा गौरव केला. माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, शिवसेना नेते रामदास गोल्हार, नेवासा नगरपंचायतीचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांनीही उपस्थित राहून अभिवादन केले. कार्यक्रमात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय रायफल शूटिंग स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या वेदांत वाघमारे यांचा एक लाख रुपयांचा धनादेश देऊन गौरव करण्यात आला.

घाडगे पाटील परिवाराच्या वतीने संत-महंतांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अशोक गाढे यांनी केले. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. यानंतर उपस्थित हजारो भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## गायत्री चौगुले हिचे एलएलबी परीक्षेत सुयश



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान** : बेलपिंपळगाव ता. नेवासा येथील मुलीमध्ये एलएलबी परीक्षेत कु. गायत्री बंडोपंत चौगुले हिने एलएलबी परीक्षेत मुलींमध्ये ए ग्रेड ने उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल ड अजित काळे( राज्य उपाध्यक्ष शेतकरी संघटना) प्रा. कार्लस साठे (प्रभारी व प्रवक्ते अहिल्यानगर) जिल्हाध्यक्ष अनिल औताडे जिल्हा उपाध्यक्ष हरियाप्पा तुवर , संपर्कप्रमुख साहेबराव चोरमल नेवासा तालुकाध्यक्ष मेजर अशोक काळे युवा तालुकाध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी क्रीडा अध्यक्ष भाऊसाहेब गव्हाणे प्राचार्य बि डी शिंदे श्रीरामपूर ता. अध्यक्ष युवराज जगताप, युवा शेतकरी नेते सचिन वेताळ श्रीरामपूर तालुका युवा अध्यक्ष शरद आसने, नेवासा तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब नागवडे ड बाळासाहेब कावळे, डॉ. दिलीप कोकणे, विलास चव्हाण ज्येष्ठ शेतकरी नेते खंडेराव सरोदे, वसंतराव शेरकर, कुंडलिक सरोदे, मुमताज सय्यद,सचिन चौगुले ,माजी नगरसेवक शिर्डी व शहराध्यक्ष शिर्डी काँग्रेस प्रा. रमेश सरोदे संपर्कप्रमुख नेवासा ता. दादासाहेब नाबदे, ज्येष्ठ शेतकरी दत्तात्रय निकम आदी शेतकरी पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले.

# बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे जिल्ह्यात स्वागत



### अमृत उद्योग समूहाकडून वारकऱ्यांसाठी सुविधा

संत निवृत्तीनाथ महाराज पालखीच्या स्वागतानिमित्त अमृत उद्योग समूहाच्या वतीने वारकऱ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर, चहा-नाश्ता, निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली. तसेच एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून २५ डॉक्टर, परिचारिका व वैद्यकीय पथक तैनात करण्यात आले आहे. तालुक्यातील विविध गावांमध्येही वारकऱ्यांचे स्वागत व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : त्र्यंबकेश्वरहून पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे रविवारी अहिल्यानगर जिल्ह्यात आगमन होताच भक्तिमय वातावरणात जल्लोषात स्वागत करण्यात आले. पारेगाव बु. येथे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी पालखीचे पूजन करून वारकरी संप्रदायाचे स्वागत केले.

रिमझिम पाऊस, हिरवाईने नटलेला परिसर, टाळ-मृदुंगाचा गजर आणि विठ्ठल नामाच्या अखंड जयघोषात सुमारे २० हजार वारकरी जिल्ह्यात दाखल झाले.

यावेळी खासदार राजाभाऊ वाजे, डॉ. जयश्रीताई थोरात, कॅन्सरतज्ज्ञ डॉ. हसमुख जैन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, डॉ. कुणाल सोनवणे, बी. आर. चकोर, अविनाश सोनवणे, हौशीराम सोनवणे, सुभाष सांगळे, संपतराव गोडगे, डॉ. दत्तात्रय गडाख, ड. त्र्यंबक गडाख, दौलतराव गडाख, सोमनाथ गडाख, दिंडीचे माधव महाराज राठी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना बाळासाहेब थोरात म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भूमी असून वारकरी संप्रदाय समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. जात-पात, धर्मभेद विसरून सर्वांना एकत्र आणणारी पंढरीची वारी ही जगासाठी आदर्श परंपरा आहे. यंदा राज्यात भरपूर पाऊस पडून शेतकरी व सर्वसामान्यांचे जीवन सुखी व्हावे, अशी प्रार्थनाही त्यांनी विठ्ठल चरणी केली.

खासदार राजाभाऊ वाजे यांनी वारीतून समतेचा संदेश दिला जात असल्याचे सांगितले, तर डॉ. जयश्रीताई थोरात यांनी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असल्याचे नमूद केले. यावेळी वारकऱ्यांनी फुगड्या खेळत अभंग गायन केले आणि संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

# हरेगाव-खैरी निमगाव रस्ता त्वरित दुरुस्त करा, अन्यथा आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील हरेगाव -खैरीनिमगावच्या दिशेने जाताना दुचाकी आणि चारचाकी वाहनधारकांना रस्त्याच्या दुरवस्थेमुळे मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहेत.या रस्त्याचे काम प्रशासनाने त्वरित सुरू करावे, अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भाजपचे अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष तथा हरेगावचे सरपंच दिलीप त्रिभुवन यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनातून म्हटले आहे.



याबाबत, दिलीप त्रिभुवन यांनी निवेदनात म्हटले आहे की, दरवर्षी 'मतमाऊली' यात्रा जवळ आली की, प्रशासनाला जाग येते, या रस्त्याची थातूरमातूर दुरुस्ती केली जाते.मात्र, पावसाळा सुरू झाला की, हा रस्ता पुन्हा जसाच्या तसा होतो.त्यामुळे वाहतुकीस पूर्णपणे अयोग्य बनतो, सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहेत.या खड्डेमय रस्त्यामुळे अनेक प्रवाशांना पाठीचा आणि मणक्याचा त्रास सुरू झाला आहेत.

या निवेदनामुळे आता संबंधित रस्ते विकास विभाग आणि लोकप्रतिनिधी यावर काय पावले उचलतात, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहेत.

### खासदार, आमदारांनी आमच्याकडे थोडं तरी लक्ष द्या !

या मतदारसंघातील लोकप्रतिनिधींनी खासदार व आमदार या गंभीर समस्येकडे तात्काळ लक्ष द्यावे. त्यांनी संबंधित विभागाला रस्ता दुरुस्तीचे कडक आदेश देऊन नागरिकांचा प्रवास सुखकर करावा.जर प्रशासनाने लवकरात लवकर रस्त्याचे काम सुरू केले नाही, तर जनतेच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडले जाईल.

**दिलीप त्रिभुवन (सरपंच, हरेगाव)**

# सत्याग्रही, कोपरगावच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : शहरात सत्याग्रही कोपरगाव यांच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रविवारी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. शहर अधिक हरित व्हावे, पर्यावरणाचा समतोल राखला जावा तसेच नागरिकांमध्ये वृक्षसंवर्धनाबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन कोपरगाव नगरपालिकेचे नगराध्यक्ष पराग संधान यांच्या हस्ते झाले. यावेळी कोपरगाव नगरपालिकेचे आरोग्य सभापती वैभव आढाव, मुख्याधिकारी अजित निकत तसेच स्वच्छतादूत व वृक्षमित्र सुशांत घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गीता प्रशाला (नायडूबाई यांची शाळा) येथे विविध प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी वृक्षारोपणासोबतच लावलेल्या झाडांचे संगोपन करणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन करण्यात आले.

झाडे लावा,झाडे जगवा हा संदेश देत पर्यावरण संरक्षणासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ नागरिक मंचाचे अध्यक्ष विजयजी बंब, बाळासाहेब पांढरे, रामदास खैरे, सुभाष भास्कर, संभाजी नाईक, अशोक नायडू, शरदनाना थोरात,राजेंद्र बागुल, कादरभाई शेख, पुरुषोत्तम पगारे सर, वसंतराव शेळके, किशोर भांगे, बाळासाहेब खंडागळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. सारंग अविनाश मंत्री, रा. मंत्री गल्ली, पाथर्डी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर यांनी मौजे माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर येथील गट नं. ६०३ मधील क्षेत्र ०.३७.५० आर (खराब ०.०२.५० आर) आकार ०.१३ पै. जंगल वाहिवाटी प्रमाणे ही मिराबाई गहिनीनाथ वायकर यांच्या नावे व मालकी हक्क वहिवाटीची असलेली मिळकत खरेदी करण्याचे निश्चित केले आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्क, हितसंबंध, हिस्सा, ताबा, वहिवाट, गहाण, बोजा, न्यायालयीन वाद, मनाई आदेश, वारसाहक्क किंवा अन्य कोणताही दावा अथवा हरकत असल्यास, संबंधितांनी त्याबाबतची लेखी हरकत व कागदोपत्री पुरावा दि. ०७जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत आमचे खाली नमूद पक्षकाराचे पत्यावर सादर करावी.

निर्धारित मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व निरजोखमी असल्याचे गृहीत धरून आमचे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकतीस अथवा दाव्यास आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत.

दिनांक ०५ जुलै २०२६
सारंग अविनाश मंत्री रा.मंत्री गल्ली
पाथर्डी जि.अ.नगर मो. नं ९९६०३१२१४३
नोटीस देणार

शिक्का

Sign
Namdeo B. Jaybhay
Advocate Notary Public
At. Po. Nathanagar Tal. Pathardi,
Dist. A. Nagar Mob:9271595954


# राहुरी खुर्द येथे रेशन दुकानावर जबरी चोरी : जालिंदर ढोकणे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उंबरे** : राहुरी तालुक्यातील राहुरी खुर्दमध्ये भरलोकवस्तीत असलेल्या काळुबाई स्वयंसहायता महिला बचत गटाच्या सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानावर रविवारी (दि. ५) जुलै रोजी मध्यरात्री दरम्यान अज्ञात चोरट्यांनी ११५० क्विंटल गहू व १ क्विंटल तांदूळ तसेच बजाज कंपनीचा टेबल फॅन चोरी करून पोबारा केल्याची घटना उघडकीस आली आहे.




त्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, राहुरी खुर्द येथील हनुमान मंदिराच्या पाठीमागच्या बाजूस भर लोकवस्तीत काळुबाई महिला बचत गटाचे सरकार मान्य स्वस्त धान्य दुकान आहे. सदर दुकानचे चालक सोमनाथ पागिरे यांच्या मातोश्री नित्यनियमाप्रमाणे सकाळच्या सुमारास फेरफटका मारण्याकरीता गेले होते. त्यावेळी सदरच्या स्वस्त धान्य दुकानाच्या दरवाजाची कडीकोंडा तोडलेला दिसून आल्याने त्यांनी तात्काळ सोमनाथ पागिरे यांना याबाबत माहिती दिली.

पागिरे हे स्वत घटनास्थळी आले असता, त्यांना दुकानाचा दरवाजा व कुलूप कोंडे तोडल्याचे दिसून आले, आतमध्ये पाहिले असता गहू व तांदूळ सह टेबल फॅन ची चोरी झाल्याचे लक्षात आले, त्यांनी सदरची माहिती राहुरी तालुका पुरवठा निरीक्षक सुदर्शन केदार यांना दिली घटनेची माहिती समजतात पुरवठा निरीक्षक सुदर्शन केदार, ग्राम महसूल अधिकारी तुषार काळे तसेच राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस हेड कॉन्स्टेबल भाऊसाहेब शिरसाट, दारकुंडे यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.पोलीस प्रशासनाचे परिसरातील विविध दुकाने, स्टेशनरी, गॅरेज आधी दुकानमध्ये असलेल्या सीसीटिव्ही फुटेज हस्तगत करून घेण्याचे काम सुरू केले आहेत.

तसेच अहिल्यानगर येथून ठसे तज्ञाची टीम घटनास्थळी प्राचारण करण्यात आली होती. त्यामुळे लवकरच घटनेचा तपास लागून आरोपी गजाआड होईल अशी माहिती पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे. राहुरी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

# तालुक्यातील पतसंस्था चळवळीस पाठबळ देणार : आ. ओगले



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यात चांगले काम करणाऱ्या पतसंस्थांना भविष्यात निश्चितपणे पाठबळ दिले जाईल, अशी ग्वाही आमदार हेमंत ओगले यांनी दिली.

राष्ट्रीय सहकार सप्ताहानिमित्त श्रीरामपूर येथील सहायक निबंधक कार्यालय, सहकार भारती व तालुका पतसंस्था फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘सहकारी पतसंस्था चळवळीची भविष्यातील वाटचाल व सहकार विभागाकडून अपेक्षा’ या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

आ. ओगले म्हणाले, पतसंस्था सर्वसामान्यांना आर्थिक आधार देऊन सक्षम करत आहेत. त्यामुळे चांगल्या संस्थांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहू; मात्र चुकीचे काम करणाऱ्यांना पाठीशी घालणार नाही. याप्रसंगी राज्य पतसंस्था फेडरेशनच्या उपकार्याध्यक्ष डॉ. अंजली पाटील यांनी सकारात्मक राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला सहायक निबंधक आर. एल. गडेकर, सुरेशराव वाबळे, शिवाजीराव कपाळे, वासुदेव काळे, सचिन गुजर, अनिरुद्ध महाले यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक वासुदेव काळे यांनी केले, सूत्रसंचालन अजय चौधरी यांनी केले, तर आभार भाऊसाहेब मुळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री सिद्धिविनायक पतसंस्थेच्या संघाने परिश्रम घेतले.



# हरवले आहे

माझा डिप्लोमा शाळेचा दाखला हा औरंगपूर ते पुणे प्रवासादरम्यान दिनांक ०३/०७/२०२६ रोजी कोठेतरी हरवला आहे.

सदर कागदपत्रे कोणास मिळाल्यास कृपया खालील पत्त्यावर किंवा पाथर्डी पोलिस स्टेशनला संपर्क साधावा. तसेच या कागदपत्रांचा कोणत्याही गैरवापरास मी जबाबदार राहणार नाही.

**प्रतिभा सुभाष काकडे**
रा. औरंगपूर, ता. पाथर्डी,
जि अहिल्यानगर

## पान १ वरुन

### सलग दुसऱ्यादिवशी प्राणघातक हल्ला

माहिती वैद्यकीय सूत्रांकडून मिळाली आहेत.हा हल्ला ज्या ठिकाणी झाला, तो परिसर नेहमी गजबजलेला असतो आणि महत्त्वाच्या शासकीय तसेच प्रशासकीय कार्यालयांना जोडणारा मुख्य मार्ग आहे. अशा संवेदनशील भागात एवढा मोठा हल्ला झाल्याने कायदा व सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सलग दोन दिवस झालेल्या या गंभीर गुन्हेगारी
घटनांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्राथमिक माहितीनुसार, या प्रकरणाची पोलिसात अद्याप नोंद किंवा कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.हे विशेष .

### देशभरातील ५८ इंजीनियरिंग महाविद्यालये बंद!

प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमालीची घटली होती. नियमाप्रमाणे आवश्यक असलेले पात्र प्राध्यापक टिकवून ठेवण्यात महाविद्यालये अपयशी ठरलीत. लायब्ररी, लॅब आणि इतर पायाभूत सुविधांच्या नियमांचे पालन न करणे, या कारणांचा त्यात समावेश आहे.जर एखादे महाविद्यालय पूर्णपणे बंद झाले, तर तिथल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या कॉलेजमध्ये ट्रान्सफर केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेताना महाविद्यालयाचे स्टेटस तपासून घेणे गरजेचे आहे.

### चिंचोली-कोल्हार खुर्द येथील पाणी साठवण तलावात बुडून तरुणाचा मृत्य

जवानांनी मृतदेह पाण्याबाहेर काढून शवविच्छेदनासाठी रुग्णवाहिकेद्वारे राहुरी येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवला. या कठीण बचावकार्यात खालील यंत्रणांनी राहुरी, देवळाली प्रवरा आणि श्रीरामपूर नगरपालिका प्रशासन आपत्ती व्यवस्थापन विभागाचे आपदा मित्र अनिल जाधव, ईआरटी रेस्क्यू टीम अहिल्यानगर, पोलीस कर्मचारी रवी पवार, चिंचोलीचे तलाठी प्रशांत शेटे, जीवनदायी रुग्णवाहिका, निखिल भोसले मदत कार्य केले. या स्थानिक तरुण शेतकऱ्याच्या युवकाच्या अकाली जाण्याने ठाकरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आहे.

### रायगड-पुणे-नाशिक घाटमाथ्याला रेड अलर्ट

मिसाळवाडी परिसरात ढगफुटीसदृश पावसानंतर भीषण पूरस्थिती निर्माण झाली. गावाचा संपर्क तुटल्याने ग्रामस्थांनी मानवी साखळी तयार करून विद्यार्थी, महिला आणि शेतकऱ्यांची सुरक्षित सुटका केली. भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द धरणातून सध्या २७ दरवाजांमधून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. रायगडमधील अंबा, कुंडलिका आणि पाताळगंगा नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. मुंबईत मुसळधार पावसामुळे अंधेरी सबवे पुन्हा जलमय झाला असून वाहतूक विस्कळीत झाली आहे. तर वसई-विरारमध्ये दुपारनंतर पावसाचा जोर वाढत १७९ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मिठागर परिसरात पाणी शिरल्याने अनेक कुटुंबे घरातच अडकून पडली आहेत. हवामान विभागाच्या माहितीनुसार, उत्तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात काही ठिकाणी ६०० मिमीपर्यंत पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, अनावश्यक प्रवास टाळावा आणि सतर्क राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. **मुंबईत चौथा बळी!** चेंबूर येथे शाळेच्या स्कूलबसवरती झाड पडल्याने शाळकरी मुलाच्या मृत्यूची घटना ताजी असताना पुन्हा एकदा झाड पडून मुंबईकरांचा जीव गेल्याने मुंबई महापालिकेच्या मान्सूनपुर्व तय्यारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाला आहे. चेंबूर येथे शाळेतील झाड कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच, कुर्ल्यातील या घटनेमुळे मुंबई महानगरपालिकेच्या मान्सूनपूर्व झाड छाटणीच्या दाव्यांवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### 'महाराष्ट्र एपस्टीन फाइल्स'वरून वाद

कारवाईचा इशारा देणाऱ्या रुपाली चाकणकर यांनी आता चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक आणि अभिनेत्री दिपाली सय्यद यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. नोटीशीत, न्यायप्रविष्ट प्रकरणाशी संबंधित असताना टीझर आणि विविध संकेतस्थळांवर रुपाली चाकणकर यांचे नाव वापरून त्यांची जाणीवपूर्वक बदनामी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित चित्रणामुळे त्यांच्या प्रतिमेला धक्का पोहोचल्याचा दावा करत २५ कोटी रुपयांच्या अब्रुनुकसानीची मागणी करण्यात आली आहे. अशोक खरात प्रकरण उघडकीस आल्यानंतर त्याच्या कथित राजकीय संबंधांचीही चर्चा झाली होती. त्या पार्श्वभूमीवर या चित्रपटाच्या टीझरमुळे पुन्हा एकदा वाद निर्माण झाला आहे. या नोटीशीनंतर चित्रपटाच्या निर्माते-दिग्दर्शक किंवा अभिनेत्री दिपाली सय्यद यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही.

# घोडेगाव येथील संचालकांचा सचिन देसरडा यांच्या कडुन सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव** - मुळा सहकारी साखर कारखान्याच्या झालेल्या निवडणुकीत घोडेगाव येथील दोघे संचालक म्हणून निवडून आल्याने या नुतन संचालकांचा भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष सचिन देसरडा व मित्र मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

घोडेगाव येथील सचिन देसरडा यांचे राजकीय कट्टर विरोधक असलेले वसंत सोनवणे व दत्तात्रय बऱ्हाटे हे मुळा सहकारी साखर कारखान्याच्या झालेल्या निवडणुकीत संचालक म्हणून निवडून आल्याने गावातील राजकीय विरोध बाजूला ठेवून सचिन देसरडा व मित्र मंडळाच्या वतीने या दोन नवनिर्वाचित संचालकांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी देसरडा यांनी बोलताना सांगितले की राजकारण हे राजकारणापुरतं मर्यादित असावं परंतु गावातील एखादा व्यक्ती उच्च पदावर निवडून आल्यास तो कट्टर विरोधक जरी असला तरी त्याचा सन्मान करण व त्यांना प्रोत्साहन देण हे आपलं आद्य कर्तव्य समजून आपण



फोटो ओळ : घोडेगाव ता.नेवासा येथील साखर कारखान्याच्या नुतन संचालकांचा सत्कार करताना सचिन देसरडा व ग्रामस्थ (छाया -सोपान भगत)

समाजात काम कर्ण उचित असल्याचं यावेळी त्यांनी सांगितलं याप्रसंगी राजेंद्र देसरडा, दिलीप लोखंडे, अशोक येळवंडे,अरुण जाधव, दिपक जाधव,पंकज लांभाते, येळवंडे मेजर,पारस चोरडिया,संदीप येळवंडे, विजय आव्हाड, दादा बऱ्हाटे, भीमराज येळवंडे, मनोज बोरुडे,सतीश थोरात संजय चेमटे, शरद चेमटे, फक्कड बऱ्हाटे, दिलीप काळे, अलिभाई शेख,राजु येळवंडे,संतोष कुवाड,राजु जाधव, भगत वैरागर, डॉ सुनील वैरागर, रवींद्र आल्हाट, प्रशांत लोंढे, संतोष भिंगारदिवे, अण्णा सांगळे, संदीप सोनवणे, बाळासाहेब सोनवणे, रमेश जाधव, जालिंदर चेमटे,पप्पू चौधरी,नाजीम सय्यद,जॉन आंग्रे आदी उपस्थित होते.

## तुर्काबाद येथे कृषी सप्ताह उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तालुक्यातील तुर्काबाद येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती तालुका कृषी अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कृषी सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.आयोजित करण्यात आलेल्या कृषी सप्ताह मध्ये एल निनो परिस्थितीत खरीप पिकाचे नियोजन, सघन कापुस लागवड, हुमणी अळी नियंत्रण, फ्रेमवर्क फॉर फर्टीलायझर सेल अँप, आधुनिक शेती तंत्रज्ञान व नैसर्गिक शेती पद्धती. विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी तुर्काबाद गटाचे जिल्हा परिषद सदस्य स्वाती योगेश पाटेकर सरपंच कल्पना पाटेकर उपसरपंच सुदर्शन प्रेमभरे गटविकास अधिकारी सुहास वाघचौरे कृषी विज्ञान केंद्र गंधेली येथील शास्त्रज्ञ वाघ पंचायत समिती कृषी अधिकारी अजय गवळी, विस्तार अधिकारी रविकिरण दीक्षित, शेषराव चांदणे, रतन तायडे, मंडळ कृषी अधिकारी एस. एन. साळुंखे कृषी अधिकारी प्राजक्ता रणसिंग मॅडम उपकृषी अधिकारी एस. एस. कातोरे आत्मा अधिकारी (इढच्) दिलीप मोटे ग्रामपंचायत अधिकारी पी .एस. पाटील ग्रामपंचायत सदस्य सहाय्यक कृषी अधिकारी एस .एस. उदावंत गंगापूर तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# १० वर्षांपासून फरार असलेला आरोपी जेरबंद

## श्रीरामपूर शहर पोलिसांची धडक कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : गेल्या दहा वर्षांपासून पोलिसांना हुलकावणी देणाऱ्या आणि न्यायालयाकडून अटक वॉरंट जारी झालेल्या एका अट्टल फरार आरोपीला श्रीरामपूर शहर पोलिसांनी अत्यंत शिताफीने अटक केली आहे. रामभाऊ शिवाजी निकम (रा. वळदगाव, ता. श्रीरामपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीरामपूर येथील प्रथमवर्ग न्यायालय कोर्ट नं. १ कडील आर.सी.सी. नं. २७९/२०१५ मधील गुन्ह्यात आरोपी रामभाऊ



निकम हा गेल्या १० वर्षांपासून फरार होता. स्वतःचे अस्तित्व लपवून तो पोलिसांना वारंवार गुंगारा देत होता. पोलिसांकडून त्याचा कसून शोध सुरू असताना श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहिती मिळाली की, सदर आरोपी रामभाऊ निकम हा सध्या वळदगाव शिवारात आलेला आहेत. त्यांची माहिती मिळताच पो.नि.खैरे यांनी विलंब न करता पथकाला तात्काळ त्याठिकाणी रवाना केले. पथकाने वळदगाव शिवारात शोधमोहीम राबवून आरोपीची ओळख पटवली आणि त्याला ताब्यात घेतले. अटक केल्यानंतर आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहेत. या कारवाईकामी पोलीस अधीक्षक मुम्मका एम सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या वॉरंट पथकातील पुढील कर्मचाऱ्यांनी ही यशस्वी कामगिरी केली.सहा.फौ. प्रसाद साळवे, पो.कॉ. प्रवीण दैमीवाल, पो.कॉ. राहुल पौळ आदीनी कारवाई केली.

> **श्रीरामपूर विभागातील फरार, पाहिजे असलेले आरोपी आणि न्यायालयाकडून अटक वॉरंट निघालेल्या गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांना गजाआड करण्याची ही धडक मोहीम यापुढेही अशीच सातत्याने सुरू राहील, असा इशारा पोलिसांकडून देण्यात आला आहे.**
>
> **विशाल खैरे**
> **श्रीरामपूर शहर पोलीस निरीक्षक**

## महाराजस्व शिबीरे प्रत्येक गावात व्हावीत : आ.कर्डिले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

करंजी : महाराजस्व अभियाना अंतर्गत सर्वच सुविधा एकाच छताखाली व तात्काळ दिल्या जातात.त्यामुळे अशी शिबिरे प्रत्येक गावात व्हायला हवीत असे मत आमदार अक्षय कर्डिले यांनी व्यक्त केले.मिरी ता.पाथर्डी येथे राज्य शासनाच्या वतीने शासन आपल्या दारी या अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते.यावेळी मिरीचे माजी सरपंच संतोष शिंदे,राजुमामा तागड व डॉक्टर एम एस गवळी उपस्थित होते.

महसूल,कृषी,आरोग्य,महिला व बालविकास, ग्रामपंचायत व पुरवठा विभागांच्या संयुक्त सहभागातून आयोजित या शिबिरात सुमारे ३५० लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.सातबारा,८-अ उतारे,उत्पन्न,रहिवासी,जाती व



मिरी ता.पाथर्डी येथे महाराजस्व अभियानाचा लाभ देताना आ.अक्षय कर्डिले व महिला ग्रामस्थ

नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्रे, ॲग्रीस्टॅक व पीएम-किसान नोंदणीसह विविध महसुली सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच अनेक तक्रारींचे जागेवरच निराकरण करण्यात आले.
यावेळी आमदार अक्षय कर्डिले यांच्या हस्ते विविध योजनांतील पात्र लाभार्थ्यांना ट्रॅक्टरसह कृषी यंत्रसामग्री, प्रमाणपत्रे व इतर लाभांचे वितरण करण्यात आले. तसेच कडगाव येथील समाबाई शिरसाट यांच्या कुटुंबीयांना शासनाच्या आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

या प्रसंगी प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक,तालुका कृषी अधिकारी महादेव लोंढे,नायब तहसीलदार किशोर सानप व रवींद्र शेकटकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी,कर्मचारी,लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार डॉ.उद्धव नाईक यांनी केले,सूत्रसंचालन पत्रकार सचिन नन्नवरे यांनी केले तर आभार नायब तहसीलदार रवींद्र शेकटकर यांनी मानले.

# शेवगावात गावठी कट्ट्यासह एकास अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

अमरापूर प्रतिनिधी : शेवगाव येथील बोधेगाव हातगाव मार्गावर असलेल्या हॉटेलवर पोलिसांनी छापा टाकला. या छाप्यात पोलिसांनी गावठी बनावटीच्या कट्टा व दोन जिवंत काडतुसे, एक मॅक्झिन हस्तगत केले. यावेळी पोलिसांनी शाकीर बशीर शेख (रा. बोधेगाव, तालुका शेवगाव) याला ताब्यात घेतले. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, शेवगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांना गुप्त बातमीदारामर्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने बोधेगाव हातगाव मार्गावर असलेल्या हॉटेल अमरप्रीत येथे छापा टाकला. यावेळी पोलीस पथकाने संशयास्पद रित्या आढळून आलेल्या इसमाची झडती घेतली असता आरोपीकडून गावठी बनावटीचा कट्टा, दोन जिवंत काडतुसे व एक मॅगझीन असा एकूण २० हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी पोलिसांनी शाकीर बशीर शेख (वय ३४, रा. बोधेगाव, ता. शेवगाव) याला अटक केली आहे. शस्त्र बाळगण्याचा कोणताही वैध परवाना त्याच्याकडे नसल्याचे निष्पन्न झाले. पोलिस कॉन्स्टेबल शाम गुंजाळ यांच्या फिर्यादीवरून शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी नीरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप व त्यांच्या पथकाने केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बाजीराव सानप करीत आहेत.

## निधन वार्ता

### लक्ष्मीबाई तोडमल

**राहुरी** : तालुक्यातील राहुरी खुर्द येथील लक्ष्मीबाई ऊर्फ बायजाबाई गणेश तोडमल (वय ६८) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, मुलगी, दिर, असा परिवार आहेत. माजी उपसरपंच गणेश तोडमल यांच्या त्या पत्नी होत.

### रमेश तुपे

**राहुरी** : तालुक्यातील वांबोरी येथील रमेश बाबासाहेब तुपे (वय ३२) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. यांच्या पश्चात पत्नी, वडील, दोन बंधू आहे. सामाजिक कार्यकर्ते अशोक बाबासाहेब तुपे यांचे ते बंधू होते.

## भरधाव कारच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**वैजापूर** : नागपूर-मुंबई राष्ट्रीय महामार्गावरील शिवराईजवळ शनिवारी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाला. या अपघातामुळे परिसरात काही काळ एकच खळबळ उडाली. या अपघातात साहिल रशीद इनामदार (वय २८, रा. साईप्रसाद सोसायटी, शिर्डी) याचा मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, साहिल इनामदार हा वाळुज एमआयडीसी येथील एका खासगी कंपनीत कार्यरत होता. दर शनिवारी तो दुचाकीने शिर्डी येथील आपल्या घरी जात असत. शनिवारी सायंकाळी ते शिर्डीकडे जात असताना शिवराईजवळ वैजापूरच्या दिशेने येणाऱ्या एमएच ४८ एसी ५४४३ क्रमांकाच्या भरधाव कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.अपघाताची माहिती मिळताच रुग्ण वाहिकेसह चालकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत गंभीर जखमी साहिल याला वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले.

## निकिता संपत डौले यांची पुणे कारगृह पोलीस पदी निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या अत्यंत चुरशीच्या आणि कडक शारीरिक व लेखी परीक्षांच्या टप्प्यातून यशस्वी होत, गुहा गावातील निकिता संपत डौले यांची पुणे कारगृह पोलीस पदी निवड झाली आहे. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संपूर्ण गुहा , पंचक्रोशी परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.लहानपणापासूनच देशसेवेचे स्वप्न पाहणारे निकिता संपत डौले यांनी या भरतीसाठी प्रचंड मेहनत घेतली. कठोर शारीरिक सरावाबरोबरच लेखी परीक्षेचे नियोजन त्यांनी उत्तमरीत्या केले.



त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांनी आपल्या आई-वडिलांना दिले . कुटुंबीयांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शक आजोबा राहुरी तालुका ज्येष्ठ विधीइ जगन्नाथ मनोहर डौले . न्यायाधीश महेश डौले , पी एस आय वैभव लांडगे आणि समस्त डौले पाटील परिवार , नातेवाईक यांची साथ तिला लाभली . निकीता डौले यांनी मिळवलेले हे यश ग्रामीण भागातील तरुणांसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या या निवडी मुळे विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून तसेच ग्रामस्थांकडून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

**PUBLIC NOTICE**

I, Shraddha Somnath Malve, residing at sai city newasa declare that due to a spelling error, my name was recorded as 'Shraddha Somnath Malve'. The correct spelling is 'Shradha Somnath Malve'. Both names refer to the same person. Date: 06/07/2026 Place: Newasa (Shradha Somnath Malve)"

## श्रीरामपूरात दुचाकी चोरणारा कॅमेऱ्यात कैद

**श्रीरामपूर** : शहरातील रा.साई मंदिराजवळ, सुभाष कॉलनी येथे घरासमोर लावलेली पेंशन प्लस मोटारसायकल अज्ञात चोरट्याने चोरून नेली.मात्र हा मोटारसायकल चोरणारा सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहेत. शहरातील सुभाष कॉलनीतील साई मंदिराशेजारी राहणारे जावेद सय्यद यांनी त्यांची १० हजार रूपये किंमतीची पॅशन दुचाकी क्र.एमएच-के२७८६ ही मोटारसायकल त्यांच्या घरासमोर लावलेली होती. रात्रीतून अज्ञात चोराने ही मोटारसायकल चोरून नेल्याची बाब सकाळी लक्षात आली. तेव्हा तेथे लावलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये एक इसम मोटारसायकल चोरून नेत असताना कॅमेऱ्यात कैद झाला आहेत. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात जावेद सय्यद यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.

# तहसीलदार व मंडळ अधिकाऱ्यांना पदमुक्त करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : तहसील कार्यालयातील अनागोंदी कारभाराची चौकशी करून तहसीलदार व मंडळ अधिकाऱ्यांना पदमुक्त करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

छत्रपती संभाजीनगर निवासी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की गंगापूर तहसीलदार नवनाथ वागवाड यांनी तहसील कार्यालयाचा पदभार स्वीकारल्या पासून आज पर्यंत कोणताही शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या हिता निर्णय घेतलेला नसून तहसील कार्यालयात अनागोंदी कारभार सुरू असून नागरिकांचे व शेतकऱ्यांचे विविध कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहे.

आमदार प्रशांत बंब यांनी तहसीलदार नवनाथ वागवाड यांना खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वी शेत रस्ते अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महसूल, भूमी अभिलेख व पोलीस विभागाची संयुक्त बैठक आयोजित करण्याबाबत चारवेळा पत्र दिले परंतु आज पर्यंत बैठक घेतली नसल्याचा अरोप निवेदनात करण्यात आला आहे.

शासन निर्णय प्रमाणे घरकुल लाभार्थ्यांनी वेळीवेळी मोफत ५ ब्रास वाळूची विचारणा केली,पण वाळु उपलब्ध नसल्याचे कारण पुढे करून तहसीलदार यांनी टाळाटाळ





केली. आमदार प्रशांत बंब यांनी दि.२८ व २९ जुन २०२६ रोजी स्थानिक पोलीसांना सोबत घेऊन तालुक्यातील ८ ठिकाणी असलेला अवैध वाळू साठा वर २५०० ब्रास वाळू साठा जप्त करण्यात आला मात्र.तलाठी व मंडळ अधिकारी विरोधात कारवाई कोण करणार असा प्रश्न उपस्थित केला आहे.

फार्मर आयडीची अंतिम मान्यता देण्याचे अधिकार तहसीलदारांना असताना,खाजगी सेतु केंद्रावर पैसे घेऊन ठरावीक शेतकऱ्यांना मान्यता देत असून तहसीलदारांनी कोणतीही कारवाई केली नाही.

तालुक्यातील मंडळात गौण खनिज उत्खनन सर्रासपणे सुरू आहे.तक्रारी झाल्या पण स्थळ पाहणी करण्यासाठी तलाठी, मंडळाधिकारी ना तहसीलदार आले यामध्ये लाखो रुपयांचा महसुलला चुना लावण्यात आला आहे. पिंपळगाव दिवशी येथे दिलीप बिल्डकॉन कंपनी चे १ कोटी ५६ लाख,टेंभापुरी येथील ३३ लाख दंडाची वसुली केली नाही,

डोणगाव मंडळातील मौजे सनव येथे तत्कालीन जिल्हाधिकारी यांना जप्त केलेला ४००० ब्रास वाळू साठा चोरीला गेला असताना याबाबत अद्याप कोणतीही कारवाई झाली नसून यास जबाबदार कोण . तालुक्यातील मंजरपुर येथील शेत रस्त्याच्या वादातून झालेल्या हाणामारीत एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली आहे. यासह आदी मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत.निवेदनावर शेतकरी कृती समितीच्या इंजी.महेशभाई गुजर व राहुल ढोले यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

तहसील कार्यालयात प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र नायब तहसीलदार पदाचे नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करुन तालुक्यातील शेतकरी नागरिकांच्या समस्या पुढील १ महीनाभर सोडवण्याचे आश्वासन निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांनी शेतकरी कृती समितीला दिले

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

सोमवार दि .०६ जुलै २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९ २७८ ८७७ | ७-१ | १९० १८० २४४ | जोड ७०-४१-३९-५८-१२ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १९० २८० २४४ | ०-२ | १५६ २४६ ४०० | जोड ०६-४२-१९-८३-२५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९ ४८० ६६० | २-७ | १२४ ४६७ ७०० | जोड २१-०७-४५-९८-७६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**शुभ लाभ**

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

# चिमुकलीच्या वेदनेतून निर्माण केला आशेचा किरण!

## विक्रम राठोड आयोजित हृदय तपासणी शिबिराला प्रतिसाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर : प्रत्येक पालकाचे स्वप्न असते की आपल्या चिमुकल्या अपत्याला निरोगी आणि आनंदी जीवन मिळावे. मात्र स्वतःच्या अवघ्या सहा वर्षांच्या मुलीला जन्मजात हृदयातील छिद्राचा आजार असल्याचे समजल्यानंतर विक्रम अनिलभैया राठोड यांच्या आयुष्यात संघर्षाचा नवा अध्याय सुरू झाला. मुलीच्या उपचारांसाठी दर महिन्याला करावी लागणारी खर्चिक २ऊ-इको तपासणी, शस्त्रक्रियेची प्रतीक्षा आणि तिच्या भवितव्याची सततची चिंता या सर्व वेदना त्यांनी जवळून अनुभवल्या. याच वेदनेतून आपल्यासारखी वेळ दुसऱ्या कोणत्याही आई-वडिलांवर येऊ नये, या भावनेने त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बालकांसाठी मोफत २ऊ-इको तपासणी व हृदय शस्त्रक्रिया नोंदणी शिबिराचे आयोजन केले. हा उपक्रम मोठ्या प्रतिसादात यशस्वी ठरला.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, जुपिटर हॉस्पिटल, पुणे, आरोग्यदूत फाउंडेशन आणि शिवसेना अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने सिव्हिल हॉस्पिटल येथे आयोजित या शिबिरात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने पालकांनी



आपल्या मुलांची तपासणी करून घेतली. तज्ज्ञ बालहृदयरोगतज्ज्ञ डॉ. राहुल सराफ आणि बालहृदय शल्यचिकित्सक डॉ. अभिजित नाईक यांनी बालकांची तपासणी करून आवश्यक त्या शस्त्रक्रियांसाठी मार्गदर्शन केले.

राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे शिबिरात सहभागी होत विक्रम राठोड यांच्या संवेदनशील पुढाकाराचे विशेष कौतुक केले. यावेळी त्यांनी दिवंगत आ. अनिल राठोड यांच्याशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांची आठवण करून देत त्यांच्या धर्माभिमानी आणि समाजाभिमुख कार्याचा गौरव केला. त्यांचा सामाजिक वारसा विक्रम राठोड समर्थपणे पुढे नेत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनीदेखील ऑनलाईन सहभागी होत या उपक्रमाचे अभिनंदन केले. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी शिवसेनेचे सचिव रामजी रेपाळे साहेब शिवसेनेचे आरोग्य विभाग प्रमुख मंगेश चिवटे, अनिल शिंदे, संभाजी कदम, बाळासाहेब बोराटे, रणजीत परदेशी, सचिन गायकवाड , दत्ताभाऊ कावरे, रुपाली दातारंगे, मीना लोखंडे, अनिल चव्हाण, रोहित लोखंडे, चेतन शिरसाठ, डॉ. दिनेश लोहटे, चंद्रकांत शेळके, योगेश गलांडे, अभिषेक भोसले, ज्योती शिरसाठ, श्रीपाद सावंत, , ओंकार सातपुते, नरेश भालेराव, पंकज राठोड, अक्षय नागपुरे, शुभम मीरांडे, जिग्नेश जग्गड , दत्तात्रय जायभाये, यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात अनेक बालकांची तपासणी करण्यात आली असून ज्यांना हृदय शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे, अशा बालकांवर जुपिटर हॉस्पिटल, पुणे येथे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला. कार्यक्रमानंतर विक्रम अनिलभैया राठोड यांनी भावना व्यक्त करत सांगितले, माझ्या मुलीच्या आजाराने मला समाजातील अशा हजारो पालकांचे दुःख समजले. प्रत्येक महिन्याची तपासणी, उपचारांचा खर्च आणि लेकराच्या भवितव्याची काळजी काय असते, हे आम्ही स्वतः अनुभवत आहोत. म्हणूनच या वेदनेतून समाजासाठी काहीतरी करण्याचा निर्धार केला. एकाही चिमुकल्याचा उपचार पैशाअभावी थांबू नये, हीच या उपक्रमामागची खरी प्रेरणा आहे.

# द•ख•ल

## राष्ट्रीय कबड्डी पंच परिक्षेत पवार उत्तीर्ण



**मिरजगाव:** येथील राष्ट्रीय खेळाडू किशोर बाळासाहेब पवार यांनी नुकत्याच पार पडलेल्या 'राष्ट्रीय कबड्डी पंच' परिक्षेत उत्तीर्ण होऊन विशेष प्रावीण्यासह घवघवीत यश संपादन केले आहे. अमेच्योर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मार्फत मुंबई येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कबड्डी पंच २०२६ परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परिक्षेत मिरजगावचे सुपुत्र किशोर पवार हे उत्तीर्ण झाले. त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून संघर्ष करत जिद्द व मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले असून, आता ते राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी स्पर्धांमध्ये पंचाची महत्त्वाची भूमिका बजाविणार आहेत.किशोर पवार यांनी गेली अनेक वर्षांपासून जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट काम पाहिले आहे. त्याच्या यशामुळे राष्ट्रीय स्तरावरील कबड्डी स्पर्धांमध्ये या अहिल्यानगर जिल्ह्यातील पुत्राला पंच म्हणून पाहण्याची संधी क्रीडाप्रेमींना मिळणार आहे.त्यांच्या या यशाबद्दल विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे, आ रोहितदादा पवार, गुलाब तनपुरे, परमवीर पांडुळे, डॉ.ए.बी. चेडे, प्रशांत बुद्धीवंत, नामदेव राऊत, उद्धव नेवसे, विजय तोरडमल, डॉ. पंढरीनाथ गोरे, डॉ.चंद्रकांत कोरडे, सरपंच नितिन खेतमाळस, डॉ.रजनी कोरडे, तानाजी पिसे, प्रा.अशोक कोरडे, राजेंद्र गोरे, राम रणदिवे, संपत बावडकर, आबासाहेब वीरपाटील, राहुल पवार, बांदल सर, वैभव पवार, बापुसाहेब ढोले आदींनी अभिनंदन केले.

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी कामगारांसाठी अनेक योजना सुरू केल्या : आ. राजळे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजनांच्या लाभ वितरणाचा संयुक्त मेळावा आदिनाथनगर येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेवगाव-पाथर्डी मतदारसंघाच्या आ. मोनिकाताई राजळे उपस्थित होत्या.यावेळी सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ डिसले, राहुलदादा राजळे, मोनाली राजळे, विविध संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नोंदणीकृत बांधकाम कामगार उपस्थित होते. या मेळाव्यात तब्बल ८६४ बांधकाम कामगारांना प्रत्यक्ष लाभ प्रदान करण्यात आला.यावेळी आ.मोनिकाताई राजळे म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाने असंघटित बांधकाम कामगारांसाठी अनेक लोकाभिमुख व कल्याणकारी योजना सुरू केल्या असून त्याचा लाभ आता तळागाळातील कामगारांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहे. बांधकाम कामगार हा समाजाच्या विकासाचा कणा असून त्यांच्या कष्टाला सन्मान देण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. प्रत्येक पात्र कामगाराने मंडळाकडे नोंदणी करून शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक सुरक्षा तसेच आर्थिक सहाय्याच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## श्री तिलोक जैन विद्यालयाचे स्कॉलरशिप व एन.एम.एम.एस. परीक्षेत उल्लेखनीय यश




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहरातील नामांकित अशा श्री तिलोक जैन विद्यालयचा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे आयोजित शिष्यवृत्ती (इयत्ता पाचवी व आठवी स्कॉलरशिप) तसेच एन.एन.एम.एस.परीक्षेचा निकाल अतिशय उल्लेखनीय लागला असून विद्यालयाचे तब्बल २२ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत .यामध्ये इयत्ता ५ वी मध्ये शेळके अर्णव - २६० गुण, शिंदे अन्विता - २४८ गुण ,चव्हाण साईदिप - २४४ गुण, खंडागळे स्वरा - २४४ गुण, हराळ जिज्ञासा - २१२ गुण , भालके वैष्णव - २०८ गुण , टेकाळे श्रुतिका - २ज६ गुण तसेच इ . ८ वी मध्ये कु. श्रेया तुपे - २६८ गुण, खरमाटे अनन्या - २६० गुण, गुंजाळ अक्षया - २३८ गुण, कटारिया सन्मित - २३८ गुण, सोनटक्के संग्राम - २३८ गुण, फुटाणे श्रेया - २३२ गुण, चव्हाण सायली - २२२ गुण , लाड आर्या - २२० तसेच एन.एम. एम.एस . परीक्षेत आर्या लाड , खेडकर प्रतीक्षा , मिसाळ सोहम , खेडकर प्रणव ,बुधवंत भक्ती ,राख आराध्या व देखने धनश्री अशा एकूण २२ विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांना परीक्षा प्रमुख डॉ. अनिल पानखडे, श्रीमती नंदिनी मुथ्था , चंद्रकांत उदागे, सर्व शिक्षक यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल चंपालाल गांधी ,सतिश गुगळे , सुरेश कुचेरिया, डॉ.ललित गुगळे, राजेंद्र मुथ्था, धरमचंद गुगळे यांनी अभिनंदन केले.

# धर्मवीर युवा प्रतिष्ठानच्या स्वच्छतेचे कार्य अनुकरणीय : डांगे

## बेलेश्वर मंदिर परिसरात स्वच्छता मोहीम; पाच ते सहा टन कचरा हटवला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** धर्मवीर युवा प्रतिष्ठान, नालेगाव यांच्या वतीने गेल्या सहा वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या स्वच्छता अभियानाने रविवारी ऐतिहासिक टप्पा गाठला. सलग ३०० व्या रविवारी भिंगार येथील पवित्र बेलेश्वर मंदिर परिसरात भव्य स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत मंदिर परिसरातील सुमारे पाच ते सहा टन कचरा, प्लास्टिक, झुडपे आणि गवत हटवून परिसर स्वच्छ करण्यात आला. या सातत्यपूर्ण आणि समाजाभिमुख उपक्रमाचे विविध स्तरांतून कौतुक करण्यात आले.

यावेळी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, धर्मवीर युवा प्रतिष्ठानने मागील सहा वर्षांपासून सलग ३०० रविवारी शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता अभियान राबवत नागरिकांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणे, मंदिरे, शाळा, क्रीडांगणे, स्मशानभूमी, महापुरुषांच्या पुतळ्यांचे परिसर स्वच्छ करून त्यांनी समाजात स्वच्छतेची प्रभावी जनजागृती केली आहे.धर्मवीर युवा प्रतिष्ठान, नालेगाव यांच्या वतीने आयोजित या विशेष स्वच्छता अभियानात आयुक्त यशवंत डांगे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजय चितळे, नगरसेवक निखिल वारे, ड. युवराज शिंदे, सतीश शिंदे, गोरख पडोळे, संजय ढोणे, उदय अनभुळे, अमोल राजेभोसले, भगवान काटे, संजय सपकाळ यांच्यासह कल्याण रोड स्वच्छता मोहीम ग्रुप, अहिल्यानगर ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक संघटना, हर दिन मॉर्निंग ग्रुप, भिंगार तसेच धर्मवीर युवा प्रतिष्ठानचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# शिरूर- श्रीगोंदा नूतन रस्त्याला पडले खड्डे
# प्रशासन झोपेत की कंत्राटदारावर मेहेरबान?

सर्जेराव साळवे। राष्ट्र सह्याद्री



**बेलवंडी :** नागरिकांना दर्जेदार आणि खड्डेमुक्त रस्ते मिळावेत यासाठी शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च करून सिमेंट काँक्रीटचे रस्ते तयार केले जात आहेत. मात्र, कंत्राटदारांचा मनमानी कारभार आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हे कोट्यवधी रुपये पाण्यात जात असल्याचे चित्र दिसत आहे. शिरूर - श्रीगोंदा रस्त्याच्या कामामध्ये काही दिवसांतच या सिमेंट रस्त्यावरील सिमेंटचा वरचा थर ठिकठिकाणी उखडून गेला असून, रस्त्याला जागोजागी मोठे खड्डे पडण्यास सुरुवात झाली आहे.

देवदैठण जवळ काही ठिकाणी नवनिर्मित सिमेंट काँक्रीट रस्त्याची दुरवस्था झाली असून, काही ठिकाणी रस्त्याचा वरचा सिमेंटचा भाग उखडल्याने खडी उघडी पडली आहे आणि तेथे पाणी साचले आहे. तसेच बेलवंडी जवळ देखील रस्त्याच्या कडाही ठिकठिकाणी उखाडल्याने निकृष्ट दर्जाचे काम उघड झाले आहे.

रस्त्याचे काम सुरू होते, तेव्हा या कामावर प्रत्यक्ष देखरेख ठेवण्याची जबाबदारी ज्या शासकीय अभियंत्यांची होती, ते नेमके काय करत होते? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. कंत्राटदाराने केलेल्या या अत्यंत निकृष्ट दर्जाच्या कामाला या अभियंत्यांनी मंजुरी कशी दिली? की यात काही साटंलोटं आहे? अशी शंका आता व्यक्त केली जात आहे.

या गंभीर प्रकारानंतर आता तरी प्रशासन जागे होणार का? दोषींवर काय पाऊल उचलणार, की नेहमीप्रमाणे कंत्राटदाराला पाठीशी घालणार, याकडे आता सर्व सामान्य नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# महिलांना 'महिला शेतकरी' म्हणून नवी ओळख; आ. राजळे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर रविवारी तहसील कार्यालय, शेवगाव येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. शासनाच्या विविध महसुली व इतर विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्याने नागरिकांनी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.शिबिराच्या अध्यक्षस्थानी आमदार मोनिकाताई राजळे उपस्थित होत्या. यावेळी तहसीलदार आकाश दहाडदे, मुख्याधिकारी विजय घाडगे, पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, आगारप्रमुख अमोल कोतकर, नायब तहसीलदार निलेश वाघमोरे, गायकवाड , मंडलाधिकारी श्रीनिवास आव्हाड यांच्यासह तालुक्यातील विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. तसेच भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष महेश फलके, नगरसेवक गणेश कोरडे, संजय फडके, सागर फडके, डॉ. निरज लांडे, खंडू बुलबुले, गणेश रांधवणे, राहुल मालुसरे, अजय भारस्कर, राहुल सावंत, सरपंच सचिन म्हस्के, आशाताई गरड, संभाजी कातकडे, संभाजीराव काटे, बाळासाहेब डोंगरे, शिवाजीराव भिसे, केशव आंधळे, युवा मोर्चा अध्यक्ष सुधीर जायभाये तसेच विविध गावांतील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या शिबिरात शेवगाव महसूल मंडळातील शेवगाव नगरपरिषद तसेच वरूर बु., वरूर खु., भगूर, खरडगाव, सालवडगाव, मुर्शदपूर, ठाकूर निमगाव, नजीक बाभुळगाव, माळेगाव ने., आखेगाव तितर्फा, आखेगाव डोंगर, वडगाव, थाटे, अमरापूर, सुलतानपूर खु. आणि शहाजापूर येथील लाभार्थींनी विविध महसुली सेवांचा लाभ घेतला.

## डॉ. उमेश शिरसाठ यांची उपप्राचार्यपदी नियुक्ती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**ढोरजळगांव :** प्रवरा मेडिकल ट्रस्ट संचलित आयुर्वेद महाविद्यालय व श्री एकनाथ आयुर्वेद रुग्णालय, शेवगाव येथील अगतंत्र विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. उमेश शिरसाठ यांची उपप्राचार्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या शैक्षणिक व प्रशासकीय कार्याचा गौरव म्हणून ही जबाबदारी त्यांना देण्यात आली असून महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी ते महत्त्वपूर्ण योगदान देतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र विखे, सहसचिव मोनिका सावंत, कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर तसेच महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापक व अध्यापक वर्गाने त्यांचे अभिनंदन केले.

## पाथर्डीत जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा



पाथर्डी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** आनंद चेस क्लब व एस.के. चेस क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली ११ वर्षांखालील जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा पाथर्डी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विविध बाल बुद्धिबळपटूंनी स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या बुद्धिमत्तेचा उत्कृष्ट आविष्कार घडवून आणला.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रसाद बोरुडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अनिल खाटेर, गणेश रोकडे, दीपक बडे व धीरज भावसार उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी स्पर्धकांना शुभेच्छा देत बुद्धिबळामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकाग्रता, निर्णयक्षमता आणि संयम विकसित होतो, असे प्रतिपादन केले.स्पर्धेचे पंच म्हणून सचिन कांबळे, प्रज्वल आव्हाड, दिपाली क्षीरसागर, संयम खाटेर व यशदा राठोड यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे नियोजन, व्यवस्थापन आणि यशस्वी आयोजनासाठी त्यांनी विशेष परिश्रम घेतले.स्पर्धे नंतर झालेल्या बक्षीस वितरण समारंभास आनंद चेस क्लबचे अध्यक्ष डॉ. विनय कुचेरिया तसेच ग्राम महसूल अधिकारी राजू मेरड यांची प्रमुख उपस्थिती होती. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्हे व पारितोषिके प्रदान करण्यात आली.

# राज्य तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेला अहिल्यानगरमध्ये प्रारंभ

## ७५० हून अधिक खेळाडूंचा सहभाग; आधुनिक आयोजनाचे मान्यवरांकडून कौतुक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या मान्यतेने जिल्हा तायक्वांदो असोसिएशन, अहिल्यानगर यांच्या वतीने जिल्हा क्रीडा संकुल, वाडिया पार्क येथे आयोजित करण्यात आलेल्या खुल्या महाराष्ट्र राज्य तायक्वांदो अजिंक्यपद स्पर्धेला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पीव्ही, सब-ज्युनिअर, कॅडेट, ज्युनिअर आणि युथ गटातील महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून ७५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदवत पुमसे आणि क्योरुगी या दोन्ही प्रकारांमध्ये उत्कृष्ट कौशल्याचे दर्शन घडविले. स्पर्धेतील चुरशीच्या लढतींमुळे क्रीडारसिकांनाही उच्च दर्जाच्या तायक्वांदो स्पर्धेचा अनुभव घेता आला. स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम भैया जगताप यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात झाले. यावेळी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष संदीप ओंबासे, महासचिव गफार पठाण, खजिनदार डॉ. प्रसाद कुलकर्णी, शहर संघटनेचे अध्यक्ष माणिकराव विधाते, नगरसेवक महेश तवले, दत्ता गाडळकर, विशाल पवार, सुमित लोंढे, सनी वाघस्कर यांच्यासह राज्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना आमदार संग्राम भैया जगताप म्हणाले की, विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणासोबतच आपल्या आवडीच्या क्रीडा प्रकारातही सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. आज क्रीडा क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. सातत्यपूर्ण सराव, शिस्त आणि जिद्दीच्या बळावर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करता येते. क्रीडा केवळ पदके मिळवून देत नाही, तर व्यक्तिमत्त्व विकास, आत्मविश्वास आणि निरोगी जीवनशैली घडविण्यातही महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका क्रीडा प्रकाराशी नाते जोडावे.स्पर्धेतील सामने अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक सेन्सर स्कोअरिंग प्रणालीद्वारे खेळविण्यात येत असल्याने प्रत्येक गुणाचे अचूक, निष्पक्ष आणि पारदर्शक गुणांकन होत आहे. जागतिक तायक्वांदो महासंघाच्या निकषांनुसार वापरण्यात येणाऱ्या या आधुनिक तंत्रज्ञानामुळे खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचा प्रत्यक्ष अनुभव मिळत असून स्पर्धेचा दर्जाही अधिक उंचावला आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे संजय आनंदकर, राज्य उपाध्यक्ष घनश्याम सानप तसेच अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानचे संचालक महेश आनंदकर, गणेश वंजारे, धर्मनाथ घोरपडे, ऋषीकेश घोडेकर, चेतन जावळे, कार्तिक मोढवे,सार्थक कराळे यांच्यासह सर्व पदाधिकारी, प्रशिक्षक, पंच आणि स्वयंसेवक परिश्रम घेत आहेत.

**तायक्वांदो खेळाडूंसाठी करिअरच्या नव्या संधी**

**तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र ही महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनची मान्यताप्राप्त राज्यस्तरीय क्रीडा संघटना आहे. संघटनेमार्फत आयोजित अधिकृत स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना राज्य शासनाच्या ५ टक्के क्रीडा आरक्षणाचा लाभ मिळण्याची संधी उपलब्ध होत असून, त्यामुळे तायक्वांदो हा खेळ राज्यातील खेळाडूंसाठी उज्ज्वल करिअरचा प्रभावी पर्याय ठरत आहे.**

## वकिलांच्या सुरक्षेचा प्रश्न उच्च न्यायालयात; राज्य शासनाला नोटीस

सुरेश पाटील । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** राज्यातील न्यायालयीनपरिसरांमध्ये वकिलांवरील वाढत्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेची दखल घेत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य शासनाला नोटीस बजावली आहे. या याचिकेवर राज्य शासनाने आपले म्हणणे सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.

विधीज्ञ ॲड. शोमितकुमार व्यंकटराव साळुंके यांनी 'पार्टी-इन-पर्सन' म्हणून दाखल केलेल्या फौजदारी जनहित याचिकेवर (सीआर पीआयएल क्र. १/२०२६) २९ जून रोजी प्राथमिक सुनावणी झाली. याचिकेत न्यायालयीन परिसरातील सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यासाठी राज्यभरातील सर्व न्यायालयांमध्ये कामकाजाच्या वेळेत कायमस्वरूपी पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

याचिकेत राहुरी, श्रीरामपूर, पाथर्डी, शेवगाव, चाळीसगाव आणि बीड येथे गेल्या दोन वर्षांत वकिलांवर झालेल्या विविध हल्ल्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. या घटनांमुळे वकिलांच्या सुरक्षिततेबरोबरच न्यायप्रक्रियेच्या स्वायत्ततेवरही परिणाम होत असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथे एका वकिलाला हातकडी लावून सार्वजनिकरित्या फिरविण्यात आल्याच्या घटनेचाही याचिकेत उल्लेख करण्यात आला असून, या प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच अटक आणि हातकडी वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन झाले का, याचीही चौकशी करण्याची विनंती करण्यात आली आहे.

## द • ख • ल

## दिवे घाटातील पुरंदरचा राजा ६५ फूट उंच भव्य विठुरायाचे दिव्य दर्शन



**कवठे येमाई :** पुणे-सासवड मार्गावरील दिवे घाटात झेंडेवाडी परिसरात उभारलेली ६५ फूट उंच विठ्ठलाची भव्य दिव्य मूर्ती वारकरी आणि भाविकांसाठी श्रद्धेचे प्रमुख केंद्र बनली आहे. या मूर्तीच्या कपाळी सोन्याचा मुलामा दिलेला गंध असून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील कठीण घाटमार्गावर वारकऱ्यांना विठुरायाचे दर्शन व्हावे, या उद्देशाने ही मूर्ती पुण्यातील उद्योजक विजयसा बाबुरावसा कोल्हापुरे यांनी २०१९ उभारण्याचे कार्य केले.तर पांडुरंगाची कृपा झाली तर या ठिकाणी लवकरच प्रति पंढरपूरची निर्मिती करण्याचा मानस असल्याचे कोल्हापुरे यांनी सांगितले.आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर नुकतीच या ६५ फूट उंचीच्या या भव्यदिव्य श्री विठ्ठलाच्या मूर्तीची मान्यवरांच्या उपस्थितीत विधिवत पूजा करण्यात आली. तर या विठ्ठलाची पूजा होता च वरुणराजाने ही जोरदार उपस्थिती लावल्याचे झेंडेवाडी चे सरपंच अमर झेंडे यांनी सांगितले. तर मागील ७ वर्षांपासून दिवे घाटातील श्री विठ्ठलाची वारी पूर्वी विधिवत पूजा झाल्यानंतर वासाचे हमखास आगमन होत असल्याने वारकरी,भाविक भक्तांचे हे श्रद्धेय स्थान झाले असल्याचे ही झेंडे म्हणाले. दिवे घाटातील ही ६५ फूट उंचीची श्री विठ्ठलाची भव्य मूर्ती काळ्या पाषाणात साकारण्यात आली असून तिच्या मस्तकावरील गंध पंचधातूंचा आहे. त्यावर सोन्याचा मुलामा देण्यात आला आहे. पुण्याचे उद्योजक,प्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक विजय कोल्हापुरे यांनी जून २०१९ मध्ये ही मूर्ती उभारली. प्रसिद्ध शिल्पकार सागर भावसार यांनी या अद्वितीय कलाकृतीला मूर्त स्वरूप दिले आहे.निसर्गरम्य दिवे घाट परिसरातील ही मूर्ती आज पुणे जिल्ह्याचे एक प्रमुख पर्यटनस्थळ आणि वारकरी संप्रदायाचे प्रेरणास्थान ठरली आहे .

## नायगावच्या हद्दीत दोन दुचाकींची जोरदार धडक; एकाचा मृत्यू

**नाझरे सुपे :** पुरंदर तालुक्यातील नायगाव गावच्या हद्दीतील म्हसोबा मंदिरासमोरील रस्त्यावर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात मध्य प्रदेशातील दुर्गेश ठाकूर (वय ३५, रा. कुलारी, ता. देवरी, जि. सागर) यांचा जागीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या अज्ञात दुचाकीवरील चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उरुळीकांचन येथे उपचार सुरू आहेत. याप्रकरणी जेजुरी




पोलीस ठाण्यात फेटल मोटार अपघात रजिस्टर क्र. ०६/२६ दाखल करण्यात आले आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवार (दि. ३ जुलै) रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास एमएच-१२-एक्सडी-८८६७ क्रमांकाच्या मोटरसायकलवरून दुर्गेश ठाकूर हे पारगाव मेमाणे येथून नायगावकडे जात होते. त्यावेळी समोरून येणाऱ्या अज्ञात मोटरसायकलची त्यांच्या दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक बसली. या भीषण अपघातात दुर्गेश ठाकूर यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर दुसऱ्या मोटरसायकलवरील अज्ञात चालक गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी उरुळीकांचन येथे हलविण्यात आले. या अपघाताबाबत मृताचे भाऊ रुपेश मुन्ना ठाकूर (वय ३०, रा. कुलारी, ता. देवरी, जि. सागर, मध्य प्रदेश) यांनी पोलिसांना माहिती दिली. त्यावरून जेजुरी पोलीस ठाण्यात फेटल मोटार अपघाताची नोंद करण्यात आली आहे. या प्रकरणाची नोंद पोलीस हवालदार एस. बी. लोंढे (बकल क्र. २४२०) यांनी केली असून पुढील तपास सहायक फौजदार कारंडे करीत आहेत. अपघातातील अज्ञात दुचाकी व तिच्या चालकाचा शोध पोलीस घेत आहेत.

## घरभेटींची जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडून पाहणी

**पुणे :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत बूथस्तरीय अधिकारी सध्या घरोघरी जाऊन मतदारांना प्रगणना नमुना अर्ज वितरित करून आवश्यक माहिती संकलित करत आहेत. या घरभेटी मोहिमेची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज शिवाजीनगर, हडपसर आणि पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील विविध मतदान केंद्र परिसरांना भेट दिली. यावेळी त्यांनी बीएलओंकडून सुरू असलेल्या घरभेटींच्या कामकाजाची माहिती घेतली तसेच मतदारांना प्रगणना फॉर्मचे वितरण, माहिती संकलन आणि पडताळणीची प्रक्रिया तपासली. नागरिकांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करण्याचे आवाहन करत त्यांनी कोणताही पात्र मतदार मतदार यादीतून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना बीएलओंना दिल्या. जिल्हाधिकारी डुडी यांनी मतदार यादीतील माहिती अचूक, अद्ययावत आणि विश्वासार्ह करण्यासाठी ही मोहीम अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. नागरिकांनी बीएलओंना आवश्यक कागदपत्रे व अचूक माहिती वेळेत उपलब्ध करून देत या लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले.

# इंद्रायणी प्रदूषित करणाऱ्यांची गय नाही

## कठोर कारवाईचे महापौर रवी लांडगे यांचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर इंद्रायणी नदीमध्ये दिसून आलेल्या फेसाच्या घटनेची महापौर रवी लांडगे यांनी शुक्रवारी प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, गटनेते सचिन गिलबिले, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, योगी निरंजननाथ गुरु शांतीनाथ, नगरसेवक, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी महापौर रवी लांडगे म्हणाले, ''इंद्रायणी नदीचे पावित्र्य आणि पर्यावरण अबाधित राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नदी प्रदूषित करणाऱ्या कोणत्याही आस्थापनेची गय केली जाणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी अशा आस्थापनांवर तातडीने कठोर कारवाई करावी आणि सातत्याने निरीक्षण ठेवावे,'' असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले.

**आषाढी वारीपूर्वी फेसाळलेल्या इंद्रायणीची प्रत्यक्ष पाहणी; प्रशासनाकडून स्वच्छतेवर भर**

आषाढी वारीसाठी राज्यभरातून लाखो वारकरी आणि भाविक आळंदीत दाखल होणार असल्याने त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि निर्मळ वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सर्वतोपरी प्रयत्नशील असल्याचेही महापौरांनी सांगितले.यावेळी नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे यांनीही इंद्रायणी नदीच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन केले. ''इंद्रायणी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचे केंद्र असून तिचे पावित्र्य जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. नगरपरिषद नदी स्वच्छता, प्रदूषण नियंत्रण आणि भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. प्रशासन, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा आणि नागरिकांच्या समन्वयातून इंद्रायणीचे पावित्र्य कायम राखले जाईल,'' असे त्यांनी सांगितले. पाहणीनंतर संबंधित विभागांना नदीतील फेस निर्माण होण्यामागील कारणांचा सखोल तपास करून तातडीने उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

## कोथळे प्रशालेत स्पर्धा, बक्षीस वितरण व वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** विद्या महामंडळ प्रशाला, कोथळे येथे लक्ष्मण जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व, निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेनंतर विजेत्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. तसेच विद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.




**विद्या महामंडळ प्रशाला, कोथळे येथे आयोजित विविध स्पर्धांतील विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण व वृक्षारोपण उपक्रमात आयोजक, पदाधिकारी व मान्यवर सहभागी.**

लक्ष्मण जगताप यांचे पुत्र मनोहर जगताप, संघर्ष युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. ज्ञानेश्वर जगताप तसेच सुवर्णा जगताप आणि ॲड. संगीता भोईटे यांच्या पुढाकारातून या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. स्पर्धा लहान गट व मोठा गट अशा दोन विभागांत घेण्यात आल्या. प्रत्येक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निश्चित करून विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वह्यांचे वाटप करण्यात आले. तसेच येत्या १५ ऑगस्ट रोजी विजेत्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके देण्यात येणार असल्याची घोषणाही आयोजकांनी केली.

मल्हार शिक्षण मंडळाचे सचिव प्रमोद जगताप यांच्या संकल्पनेतून विद्यालयाच्या दर्शनी भागात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. संघर्ष युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. ज्ञानेश्वर जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त लक्ष्मण जगताप, मनोहर जगताप, ॲड. ज्ञानेश्वर जगताप, सुवर्णा जगताप आणि ॲड. संगीता भोईटे यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.कार्यक्रमास मल्हार शिक्षण मंडळाचे सचिव प्रमोद जगताप, सहसचिव ज्ञानेश्वर (राजुदादा) जगताप, खजिनदार तुषार खैरे, मुख्याध्यापक प्रशांत कदम, लक्ष्मण जगताप, मनोहर जगताप, संघर्ष युवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ॲड. ज्ञानेश्वर जगताप, सुवर्णा जगताप, ॲड. संगीता भोईटे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक घोगरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षक भोसले यांनी मानले.

## दशक्रिया विधीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मंचर :** कै. हनुमंत धोंडिबा वाबळे (दादा) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तपनेश्वर मंदिर परिसर, मंचर (ता. आंबेगाव) येथे दशक्रिया विधीनिमित्त मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. श्रद्धांजली कार्यक्रमासोबत सामाजिक बांधिलकी जपत आरोग्यसेवेचा उपक्रम राबविण्याच्या या अभिनव संकल्पनेचे उपस्थितांनी कौतुक केले.

जयहिंद पॉलीक्लिनिक संचलित ओम चैतन्य मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व डॉ. अभिजित बोचरे केअर कार्डियाक सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरात नागरिकांची रक्तदाब, रक्तातील




साखर (इडङ) तसेच ईसीजी (एउॠ) तपासणी मोफत करण्यात आली. याशिवाय डॉक्टरांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन करून गरजू नागरिकांना मोफत औषधांचे वाटपही केले.

प्रसिद्ध डॉ. सुदाम खिलारी यांनी निरोगी जीवनशैली, आरोग्य संवर्धन आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा याविषयी मार्गदर्शन करत समाजप्रबोधन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांना उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कै. हनुमंत वाबळे यांच्या कन्या डॉ. साधना गावडे व जावई डॉ. दुष्यंत गायकवाड यांनी स्मृतिप्रीत्यर्थ समाजोपयोगी उपक्रम राबविण्याची संकल्पना मांडली. त्यांच्या पुढाकारातून आयोजित या शिबिराचा परिसरातील अनेक नागरिकांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वाबळे परिवार, ग्रामस्थ, नातेवाईक, विविध संस्था व स्वयंसेवक यांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी ट्रेडिंग कंपनीचे प्रोप्रायटर श्री. नितीनशेठ थोरात यांनी केले. यावेळी श्री. कुलदीप मोरे, श्री. प्रशांत सोनवणे, श्री. विशाल भालेराव आणि श्री. तुषार आंधळे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## मंचर दूध भेसळीचे मुख्य केंद्र ?

### कृत्रिम दूध रॅकेटचा मोठा पर्दाफाश; १३ जण ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** उत्तर पुणे जिल्ह्यातील मंचर परिसरात दूध भेसळीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. अन्न व औषध प्रशासन आणि पुणे ग्रामीण पोलिसांनी संयुक्त कारवाई करत तब्बल १३ संशयितांना ताब्यात घेतले असून, रविवारी (दि. ५) या कारवाईत दूध भेसळीच्या साखळीचा मोठा उलगडा झाला आहे.

प्राथमिक तपासात शिक्रापूर, पिंपळगाव आणि अवसरी परिसरात धाडी टाकल्याची माहिती समोर आली आहे. या ठिकाणांहून दूध आणि खव्याचे नमुने तपासणीसाठी जप्त करण्यात आले आहेत. दर हजार लिटर दुधामध्ये सुमारे ५०० लिटर रासायनिक द्रव्ये तसेच शाम्पूसारख्या पदार्थांचा वापर करून कृत्रिम दूध तयार केले जात असल्याची धक्कादायक बाब तपासात उघड झाली आहे. या कारवाईदरम्यान आंबेगाव, खेड, जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील विविध दूध संकलन केंद्रांवर छापे टाकण्यात आले. तसेच पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील संशयितांकडून महत्त्वाचे पुरावे, नमुने आणि साहित्य जप्त करण्यात आले आहे.

दूध भेसळीबाबत पुणे ग्रामीण पोलिस आणि अन्न व औषध प्रशासनाला गोपनीय माहिती मिळाल्यानंतर पुणे ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेचे सुमारे ३० अधिकारी-कर्मचारी आणि अन्न व औषध प्रशासनाचे २० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे विविध ठिकाणी धाडी टाकल्या. या कारवाईत मंचर हे दूध भेसळीच्या रॅकेटचे प्रमुख केंद्र असल्याचे प्राथमिक तपासात समोर आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. मात्र, तपासाच्या हितासाठी पोलिसांनी संशयितांची नावे जाहीर करण्यास नकार दिला आहे.

या प्रकरणी मंचर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून काही संशयित अद्याप फरार आहेत. त्यांचा शोध सुरू असून पुढील न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दूध हा प्रत्येक घरातील दैनंदिन आहाराचा महत्त्वाचा घटक असल्याने या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

## बेल्हे येथे ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या धान्य गोदामाचे उद्या उद्घाटन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** आंतरराष्ट्रीय सहकार सप्ताह तसेच केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त बेल्हे (ता. जुन्नर) येथील बेल्हे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी लिमिटेडच्या ५०० मेट्रिक टन क्षमतेच्या धान्य गोदामाचे उद्घाटन केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते दृकश्राव्य माध्यमातून सोमवार, (ता. ६) रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

सन १९१७ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेचे सध्या ३,६३२ सभासद असून संस्थेच्या मालकीचे बेल्हे येथील व्यापारी संकुल तसेच अद्ययावत संगणकीकृत कार्यालय कार्यरत आहे. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने संस्थेमार्फत मध्यम मुदत, अल्पमुदत पीक कर्ज, ट्रॅक्टर, गाई-गोठा, पाइपलाइन, शेळीपालन, कुक्कुटपालन, जीप व कार यासाठी कर्जपुरवठा करण्यात आला आहे. आजअखेर संस्थेने सुमारे २७ कोटी रुपयांचे कर्ज वितरण केले असून बँक पातळीवर १०० टक्के आणि संस्था पातळीवर ९० टक्के कर्जवसुली झाली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेला लेखापरीक्षणात 'अ' वर्ग प्राप्त झाला असून सभासदांना सातत्याने १५ टक्के लाभांश देण्यात येत आहे.

केंद्र शासनाच्या जागतिक स्तरावरील धान्य गोदाम (थडञ्ब्ह) आणि कृषी पायाभूत सुविधा निधी (अखॠ) योजनेअंतर्गत संस्थेला ५०० मेट्रिक टन क्षमतेचे गोदाम मंजूर झाले आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ६५.६२ लाख रुपये खर्च अपेक्षित असून त्यापैकी ५६.८७ लाख रुपयांचे कर्ज पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत मंजूर करण्यात आले आहे. या कर्जावर चार टक्के व्याजदर असून सात वर्षांत परतफेड करावयाची आहे. तसेच केंद्रीय कृषी मंत्रालयाकडून तीन टक्के व्याज अनुदान आणि ३३ टक्के भांडवली अनुदान मंजूर असून त्यातील ५० टक्के अनुदान संस्थेच्या खात्यावर प्राप्त झाले आहे.

या प्रकल्पासाठी केंद्रीय व राज्य सहकार विभाग, राज्य सहकारी बँक, नाबार्ड, एनसीसीएफ, एमसीडीसी तसेच इतर सहकारी संस्थांचे सहकार्य लाभले आहे. या गोदामामुळे संस्थेच्या उत्पन्नात वाढ होण्यासह धान्य साठवणूक व व्यवसायाला चालना मिळणार आहे.

## आषाढी वारीत महावितरणकडून विद्युत सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या

### संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान अवघ्या काही दिवसांवर आले आहे. या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांच्या संपूर्ण पालखी मार्ग, विसाव्याची ठिकाणे आणि मुक्कामाच्या स्थळांवर चोख विद्युत सुरक्षा ठेवण्यासाठी महावितरणचे संचालक (संचालन). धनंजय औंढेकर यांनी शनिवारी (दि. ४) आयोजित बैठकीत विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला. आषाढी वारीमध्ये विद्युत सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड किंवा निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संपूर्ण पालखी मार्गाचे पुन्हा एकदा 'वॉक डाऊन' सर्वेक्षण करावे आणि विद्युत सुरक्षेचे 'ऑडिट' पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश श्री औंढेकर यांनी दिले. गणेशखिंड येथील 'प्रकाशभवन' सभागृहात आयोजित पुणे परिमंडलाच्या या आढावा बैठकीला मुख्य अभियंता (वितरण) अंकुर कावळे, पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे, अधीक्षक अभियंते ज्ञानदेव पडळकर, सिंहाजीराव गायकवाड, सुरेश सवाईराम, संजय वाघमारे यांच्यासह सर्व कार्यकारी व उपविभागीय अभियंते उपस्थित होते. संचालक श्री. धनंजय औंढेकर म्हणाले की, आषाढी वारीमध्ये लाखो वारकरी पायी चालतात आणि माऊलींच्या पादुकांच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होते. अशा वेळी पालखी सोहळ्याचा मार्ग, विसावा आणि मुक्कामाची ठिकाणे येथे वीज यंत्रणा पूर्णपणे सुरक्षित असणे गरजेचे आहे. महावितरणसाठी ही केवळ एक जबाबदारी नसून 'माऊलींची सेवा' करण्याची मोठी संधी आहे.

**सुरळीत वीजपुरवठ्यात हयगय झाल्यास थेट कारवाई**

पुणे परिमंडलातील गेल्या तीन महिन्यांतील वीजपुरवठ्याचा आढावा घेताना काही भागांत दीर्घकाळ वीज खंडित झाल्याच्या प्रकारांवर संचालक श्री. औंढेकर यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित अभियंत्यांना कडक शब्दांत 'अल्टिमेटम' देत ते म्हणाले की, वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे ग्राहकांना मनस्ताप तर होतोच, शिवाय महावितरणचा लाखो रुपयांचा महसूलही बुडतो. त्यामुळे वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी त्यांनी या बैठकीत मार्गदर्शनही केले. मात्र यापुढे वीजपुरवठा खंडित होण्यामागे जर कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची हयगय आढळली, तर ती अजिबात सहन केली जाणार नाही आणि संबंधितांवर थेट कारवाई करण्यात येईल, असा थेट इशारा त्यांनी दिला.

## वीजचोरी कारवाईला विरोध

### महावितरणच्या अधिकाऱ्यांना मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** पिसर्वे (ता. पुरंदर) येथील साईलिला हॉटेलवर महावितरणच्या वीजचोरीविरोधी कारवाईदरम्यान शासकीय कामात अडथळा निर्माण करून अधिकारी व कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याप्रकरणी संदिप अंकुश कोलते, सचिन कांतीलाल कोलते, गणेश कोलते, वैभव कोलते व अरुण अंकुश कोलते (सर्व रा. पिसर्वे, ता. पुरंदर) यांच्याविरुद्ध जेजुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत विक्रम किसनराव तुपे (वय ४१, प्रधानतंत्रज्ञ, महावितरण, रा. खंडोबानगर, बारामती) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, २ जुलै रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास महावितरणचे पथक पिसर्वे येथील साईलिला हॉटेलवर वीजचोरीविरोधी कारवाई करीत होते. यावेळी पथकाने ओळखपत्र दाखवून आपण महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी असल्याची माहिती दिली. मात्र, संदिप अंकुश कोलते, सचिन कांतीलाल कोलते, गणेश कोलते, वैभव कोलते व अरुण अंकुश कोलते यांनी मद्यधुंद अवस्थेत येऊन बेकायदेशीर जमाव जमवला, शासकीय कामात अडथळा निर्माण केला तसेच कनिष्ठ अभियंता साबळे यांचा मोबाईल फेकून दिला. यावेळी फिर्यादी विक्रम किसनराव तुपे तसेच वरिष्ठ अधिकारी जीवन दिलीप ठोंबरे यांना धक्काबुक्की करून मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# माऊलींच्या वैभवशाली रथाच्या मानाच्या बैलजोडीची शाही मिरवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी पालखी सोहळ्यातील वैभवशाली चांदीच्या रथाला आळंदीतील शेतकरी तुळशीराम रानवडे, हर्षवर्धन रानवडे यांच्या वतीने जुंपण्यात येणाऱ्या मानाच्या बैलजोडीची शाही मिरवणूक रविवारी आळंदीत भक्तिमय वातावरणात मोठ्या उत्साहात पार पडली. हलगी, बॅण्ड, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या अखंड जयघोषात भाविक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



यंदाच्या पालखी सोहळ्यात मानाच्या बैलजोडीचा मान शेतकरी तुळशीराम रानवडे, हर्षवर्धन रानवडे आणि उमेश रानवडे यांना मिळाला आहे. त्यांच्या बैलजोड्या अनुक्रमे पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्याच्या हद्दीत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या वैभवशाली चांदीच्या रथाची सेवा बजावणार आहेत.

स्वामींच्या मठाजवळ आळंदी देवस्थानचे विश्वस्त योगी निरंजनाथ, पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड. रोहिणी पवार तसेच बैलजोडी समितीचे अध्यक्ष बबनराव कुऱ्हाडे यांच्या उपस्थितीत मानाच्या बैलजोडीचे विधीवत पूजन करण्यात आले. चाकण चौकातून मिरवणुकीला प्रारंभ झाला. प्रदक्षिणा मार्गे मार्गक्रमण करत मिरवणुकीचा समारोप महाद्वार चौकात झाला. समारोपानंतर श्री ज्ञानेश्वर महाराज मंदिर समितीच्या वतीने मानाच्या बैलजोडीचे विधीवत पूजन करण्यात आले.

यावेळी प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, बैलजोडी समिती सदस्य शिवाजी रानवडे, विलास घुंडरे, नंदकुमार कुऱ्हाडे, रामचंद्र भोसले, ज्ञानोबा वहीले, नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे, माजी नगरसेवक डी.डी.भोसले, विष्णू वाघमारे, सागर भोसले, महेश कुऱ्हाडे, संकेत वाघमारे, सचिन रानवडे, प्रियेश रानवडे, पांडुरंग रानवडे, सौरभ रानवडे, तुषार रानवडे यांच्यासह आळंदीतील ग्रामस्थ आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारकरी संप्रदायात माऊलींच्या रथाला जुंपण्यात येणाऱ्या मानाच्या बैलजोडीला विशेष धार्मिक आणि पारंपरिक महत्त्व आहे. ही सेवा मिळणे हा रानवडे परिवारासाठी गौरवाचा आणि भक्तिभावाचा क्षण मानला जात असून, यंदाच्या शाही मिरवणुकीने आषाढी पालखी सोहळ्याच्या उत्साहात अधिकच भर घातली.

# आई-निसर्गाच्या ऋणाची परतफेड अशक्य

## हास्य योग परिवाराचा समाजसेवेचा आदर्श

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वाघोली :** ''आई आणि निसर्ग इतकं भरभरून देतात की त्याची परतफेड कधीच करता येत नाही,'' असे भावस्पर्शी उद्गार काढत नवचैतन्य हास्य योग परिवार, पुणे यांच्या वडगाव शेरी महिला ग्रुपच्या मुख्य समन्वयक लता शिंदे यांनी महिला सदस्यांसह भूमी फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य संचालित सावित्रीबाई मुलींचा निवासी प्रकल्प, वाघोली येथे सदिच्छा भेट देत समाजसेवेचा प्रेरणादायी संदेश दिला.

नवचैतन्य हास्य योग परिवाराचे संस्थापक अध्यक्ष विठ्ठल काटे आणि उपाध्यक्ष सुमन काटे यांच्या प्रेरणेतून कार्यरत असलेल्या महिला सदस्यांनी निवासी प्रकल्पातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील अनाथ व निराधार मुलींशी मनमोकळा संवाद साधत त्यांना मायेचा आधार दिला. यावेळी मुलींना खाऊ, शालेय साहित्य तसेच विविध शैक्षणिक गरजेच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले.

मुख्य समन्वयक लता शिंदे यांच्या पुढाकारातून सर्व महिला सदस्यांनी एकत्रितपणे महत्त्वपूर्ण सहकार्य करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवले. या सहकार्यामुळे निवासी प्रकल्पातील मुलींच्या शिक्षण, संगोपन आणि दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी मोठी मदत होणार आहे.समाजातील वंचित, गरजू तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रत्येकाने आपल्या परीने योगदान द्यावे, असा संदेश या भेटीतून देण्यात आला.




महिला सदस्यांनी मुलींसोबत घालवलेले प्रेमाचे क्षण आणि त्यांच्याप्रती व्यक्त केलेली आत्मीयता उपस्थितांच्या मनाला स्पर्शून गेली.

याप्रसंगी भूमी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. कैलास पवार आणि प्रकल्प व्यवस्थापक अनिता पवार यांनी नवचैतन्य हास्य योग परिवार, पुणे, मुख्य समन्वयक लता शिंदे तसेच सर्व महिला सदस्यांचे आभार मानले. समाजहिताची ही प्रेरणादायी वाटचाल भविष्यातही अशीच अखंड सुरू राहावी, अशा शुभेच्छाही त्यांनी व्यक्त केल्या.

द•ख•ल



## मुंबई महापालिकेचे निकाळजे सेवानिवृत्त

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथील मूळचे रहिवाशी व मुंबई महानगर पालिकेचे बांद्रा कलानगर येथील घन कचरा व्यवस्थापन एच पूर्व विभाग एम एल चौकीचे मुकादम अरुण भगवान निकाळजे यांनी ३१ वर्षाची सेवा पूर्ण केल्यानंतर ते ५८ व्या वर्षी सेवानिवृत्त झाले. त्यांचा सेवा पूर्तीचा कार्यक्रम नुकताच मुंबई येथील महानगर पालिकेच्या कलानगर बांद्रा येथील कार्यालयात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महानगर पालिकेचे कनिष्ठ पर्यवेक्षक श्रीकृष्ण कदम हे होते.या वेळी निकाळजे यांच्या समवेत कार्यरत असलेले महानगर पालिकेतील अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यापैकी अनेकांनी आपले मत व्यक्त करताना अरुण निकाळजे यांनी जी सेवा केली आहे. ती सेवा आम्हा सर्वांना सोबत घेऊन मिळून मिसळून केली असून त्यांच्या अखत्यारीत काम करणारे जेवढे कर्मचारी होते. त्या सर्वांवर त्याचा वेगळा असा वचक राहिल्याने निकाळजे यांनी केलेले काम हे निश्चितच आमच्यातील इतर सर्वांना प्रेरणादाई ठरेल असे सांगितले. या वेळी नगरसेविका प्रज्ञा सुनील सदाफुले, पालिकेचे माजी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक भानजी राठोड,मंगेश मयेकर, अल्पेश बागकर, दत्ताराम करंजे, किशोर राठोड गिरीश वेगडा, संजय कापसे, प्रवीण कासारे,रवींद्र कांबळे, रामचंद्र मोहिते,किशोर बंड, कदास्वामी चिनप्पा,विनोद मकवाना, रामदास बनसोडे,अशोक भागले, रावसाहेब निकाळजे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## डॉल्फिन कॉर्पोरेशनतर्फे शालेय साहित्याचे वाटप

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील अरणगाव दुमाला येथील अब्दुलभाई जहागिरदार मिरावली बाबा माध्यमिक विद्यालयात डॉल्फिन कॉर्पोरेशन लिमिटेडचे संचालक मोहनराव आढाव यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वाटप करण्यात आले. विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे अध्यक्ष सुभाष कुटे तसेच माजी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सोन्याबापू आढाव यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शालेय साहित्याअभावी शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, तसेच प्रतिकूल परिस्थितीतही त्यांचे शिक्षण खंडित होऊ नये, या सामाजिक जाणीवेतून हा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षण हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क असून समाजातील सक्षम घटकांनी त्यासाठी योगदान देणे ही काळाची गरज असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.यावेळी मोहनराव आढाव म्हणाले, व्यवसायातून मिळालेल्या उत्पन्नातील काही हिस्सा समाजासाठी खर्च करणे हे प्रत्येकाचे सामाजिक कर्तव्य आहे. या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक उदार एस डी , सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच अरणगाव दुमाला परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.



## श्री ढोकेश्वर महाविद्यालयात वृक्षारोपण

**टाकळी ढोकेश्वर :** डॉक्टर्सडे निमित्ताने श्री ढोकेश्वर महाविद्यालयात पारनेर तालुका वैद्यकीय संघटनेच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. ढोकेश्वर महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या रोपांचे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.एक विद्यार्थी - एक वृक्षही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत विद्यार्थ्यांनी वृक्षारोपणात सहभाग नोंदविला.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी वृक्षांचे पर्यावरणीय,सामाजिक आणि आरोग्यविषयक महत्त्व अधोरेखित केले. तसेच सर्व वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञानप्रति कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी जिल्हा मराठा संस्थेचे विश्वस्त सीताराम खिलारी यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.वृक्षारोपण प्रसंगी डॉ. भाऊसाहेब खिलारी,डॉ.प्रदीप दाते,डॉ.शोभा गायखे यांनी वृक्षारोपनाचे महत्व अधोरेखित केले.सर्वांनी वृक्षसंवर्धनाची शपथ घेत वृक्षारोपण केलेल्या रोपांचे संगोपन करण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी ढोकेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.लक्ष्मण मतकर,ढोकेश्वर विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी,पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे,प्रा. सुरोशी, डॉ.भाऊसाहेब खिलारी,डॉ.प्रदीप दाते,डॉ.सुनील खेडकर, डॉ. सुनील गायखे,डॉ.दत्ता दातीर आदी उपस्थित होते.

# माध्यमिक शिक्षक सोसायटी सभेत शिक्षकांमध्ये गोंधळ!

## मागील संचालकांच्या काळात १५ कोटींची तुट ; मध्यस्थीसाठी पोलिस व्यासपिठावर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**लिंपणगाव :** माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या सभेत बोलण्यावरून शिक्षक संभासदांमध्ये गोंधळ उडाला. तो मिटवण्यासाठी पोलिस चक्क व्यासपिठावर चढले. यामुळे काही शिक्षक चिडले आणि पोलिसांवर आक्षेप घेतला. यामुळे काही काळ गोंधळ उडाला मात्र नंतर सभा सुरळीत पार पडली. मागील संचालक मंडळाच्या काळात लेखा परिक्षणात १५ कोटींची तफावत आढळल्याने सभेत चांगलीच गरमागरमी झाली.

जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीची ८३ वी वार्षिक सभा नगर शहरात पार पडली. संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू झाली. यावेळी उपाध्यक्ष अर्जुन वाळके, संचालक बाबासाहेब बोडखे, महेंद्र हिंगे, सुनील दानवे, राजेंद्र कोतकर, आप्पासाहेब जगताप, माजी अध्यक्ष दिलीप काटे, कल्याण ठोंबरे ,सचिव स्वप्नील इथापे तसेच आजी माजी संचालक व्यासपिठावर उपस्थीत होते. प्रास्तावीकात अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे यांनी सोसायटीच्या आर्थिक प्रगतीची माहिती दिली. सोसायटीच्या ठेवीत २० कोटींची वाढ झाली असुन कर्जाची मर्यादा १८ लाखावरून २० लाख केल्याची व लेखा परिक्षकाच्या शुल्कात ९ लाखाची बचत केल्याची माहिती दिली. यावर सभासद वैभव सांगळे यांनी आक्षेप घेताच काही काळ गोंधळ उडाला. शिंदे म्हणाले की २५ वर्षानंतर सत्तातंर होऊन आम्ही सत्तेत आलो मात्र मागील काळातील संचालकांच्या लेखा परिक्षणात १५ कोटी रूपयांची तुट नोंदवण्यात आली आहे त्यास सध्याचे संचालक जबाबदार राहणार नसल्याचे शिंदे यांनी स्पष्ट केले.

सभासद संतोष कानडे यांनी सोसायटीच्या नावात मागील वर्षी शिक्षक व शिक्षकेतर असा उल्लेख करण्याचा ठराव करूनही त्याची कारवाई का झाली नाही असा जाब विचारला. त्यावर अध्यक्ष शिंदे म्हणाले की अहमदनगरचे आधी अहिल्यानगर असे नाव करावे लागेल नंतर पुढचे बदल करण्यात येतील.

कानडे यांनी पुन्हा सभासदांची वर्गणी का वाढवली असे विचारताच व्यासपिठासमोर गोंधळ सुरू झाला.बोलण्यावरून माईक खेचाखेची सुरू झाली. शेवटी पोलिस व्यासपिठावर चढले आणि शिक्षकांना शिस्तीचे धडे देऊ लागले. यावर काही शिक्षक सभासद चिडले यामुळे गोंधळ सुरू होताच पोलिस पुन्हा आपल्या जागेवर जाऊन बसले.

अहवाल पुस्तिकेत सभेचे छायाचित्र टाकण्याची सुचना रमजान हवालदार यांनी केली. ती मान्य करण्यात आली. सभासद महेश दरेकर यांनी थकबाकीदारांचे नावे प्रसिद्ध करण्याची मागणी केली तर वैभव सांगळे यांनी कर्ज मागणीचे प्रमाण का घटले असे विचारून सत्ताधाऱ्यांच्या काटकरीच्या कारभारावर आक्षेप घेतला.नंतर लाईट गेली व सभा ऊरकण्यात आली.

# श्रीगोंद्यात गुटखा-पानमसाल्याचे दर भडकले?

## अवैध विक्रीवर कारवाईची चाहूल, ग्राहकांची धावपळ

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** राज्यात अन्न व औषध प्रशासन अवैध गुटखा व पानमसाला विक्रीविरोधात कठोर कारवाईच्या तयारीत असल्याने त्याचे पडसाद आता श्रीगोंदा तालुक्यातही उमटू लागले आहेत. अवैध पुरवठ्यावर दबाव वाढल्याने गुटखा, पानमसाला आणि काही सिगारेट ब्रँडच्या दरात अचानक वाढ झाल्याची चर्चा व्यापाऱ्यांमध्ये आणि ग्राहकांमध्ये सुरू आहे.

श्रीगोंदा तालुक्यात रजनीगंधा, विमल, राजश्री,डायरेक्टर,गोवा, पान पराग यांसारख्या ब्रँडच्या पानमसाल्याची मोठी मागणी असून, काही उत्पादनांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. तालुक्यातील जवळपास सर्वच भागात विमल आणि आरएमडी,डायरेक्टर तसेच विमल याची सर्वधिक अधिक मागणी असल्याचे व्यापारी सांगतात. दरवाढीचा



परिणाम ग्रामीण भागातील ग्राहकांवरही होत असून, किरकोळ विक्रेत्यांनाही वाढीव दराने माल घ्यावा लागत आहे. व्यापाऱ्यांच्या माहितीनुसार, राज्यभर अवैध पुरवठा साखळीवर कारवाईची शक्यता निर्माण झाल्याने बाजारात भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे काही ठिकाणी गुटखा व पानमसाल्याचा तुटवडा जाणवू लागल्याची चर्चा आहे. पावसाळ्यात आणि हिवाळ्यात सिगारेटची मागणी वाढत असल्याने या

**घरपोच सेवा सुरू**

**श्रीगोंदा तालुक्यात अनेक ठिकाणी कागदामध्ये बांधून विमल,डायरेक्टर,आर एम डी तसेच गावठी मावा पोहोच सेवा दिली जात असल्याची माहिती एका शोकीनाने दिली असून याकडे पोलिसांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली.**

उत्पादनांच्या किमतीतही वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, श्रीगोंदा तालुक्यातही अवैध गुटखा विक्रीवर अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करून साठेबाज व अवैध विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आगामी काळात प्रशासनाच्या कारवाईनंतर अवैध गुटखा व्यापाराला कितपत आळा बसतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेतीसाठी गौण खनिजांवरील रॉयल्टी माफ महसूल मंत्र्यांचा ऐतिहासिक शासन निर्णय

**लिंपणगाव :** विधान भवनाच्या दोन्ही सभागृहात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांसाठी एक मोठी आणि दिलासादायक शासन निर्णय जाहीर केला आहे. आता शेतकरी आपल्या शेततळ्यांमधून, विहिरींमधून किंवा स्थानिक जलस्त्रोतांमधून शेतीकामांसाठी, विहीर, शेतघर, जनावरांचा गोठा बांधण्यासाठी तसेच शेत रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी गाळ, माती आणि मुरूम मोफत काढू शकणार आहेत. या गौण खनिजांच्या वापरासाठी असणारे स्वामित्वधन (रॉयल्टी) पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. जलस्त्रोतांतून गाळ काढण्यासाठी तलाठ्याकडून १५ दिवसांत साधी एनओसी घेणे बंधनकारक असेल, तर स्वतःच्या शेतातील कामांसाठी कोणत्याही परवानगीची गरज भासणार नाही. अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, या कामांसाठी वापरल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या ट्रॅक्टर किंवा बैलगाड्यांवर पोलीस अथवा तहसीलदार आता कोणतीही पकडापकडी किंवा जप्तीची कारवाई करणार नाहीत. मात्र, या खनिजांचा व्यावसायिक वापर करण्यास सक्त मनाई असेल.

ऐतिहासिक शासन निर्णयाचे मंत्र्यांचे दादासाहेब जंगले पाटील यांनी आभार मानले व स्वतःहून संपर्क करून पंतप्रधान मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये फक्त शिवपानंद रस्त्यासाठी विशेष अभियान राबवणार असल्याची माहिती दिली.



# हनुमंत मेरड यांना आदर्श व्यसनमुक्ती पुरस्कार

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव:** तालुक्यातील देवटाकळी येथील व्यसनमुक्ती व समाजप्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे हनुमंत मेरड यांना ' आदर्श व्यसनमुक्ती' पुरस्काराने गौरविण्यात आले.

रविवार, दि.५ रोजी अहिल्यानगर येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यशवंत सेना व जय मल्हार शैक्षणिक व बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात राजमाता अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवानिमित्त हा सन्मान देण्यात आला.

कार्यक्रमात हनुमंत मेरड यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी महादेव गडदे, कांतीलाल जाडकर, विजय तामर, अजय जाडकर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.व्यसनमुक्ती, समाजजागृती आणि सामाजिक प्रबोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल हनुमंत महाराज मेरड यांची पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याने परिसरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# साईसेवा पतसंस्था प्रकरणात मोठी कारवाई!

## अध्यक्ष, सचिवांसह २३ जणांच्या अडचणीत वाढ

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा पतसंस्था व मल्टीस्टेटच्या कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात मोठी आणि निर्णायक घडामोड झाली आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मुका सुदर्शन यांनी ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक शरद गोर्डे यांना महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंरक्षण अधिनियम (एमपीआयडी) अंतर्गत कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

या आदेशानंतर श्रीगोंदा पोलीस ठाण्यात अध्यक्ष, सचिव आणि संचालक मंडळासह २३ जणांविरुद्ध दाखल असलेल्या आर्थिक अफरातफर व फसवणुकीच्या गुन्ह्यात एमपीआयडी कायद्याची वाढीव कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत.

### संचालक मंडळावर एमपीआयडी कायदा लागू : ठेवीदारांच्या संरक्षणासाठी एसपींचा निर्णायक आदेश

एमपीआयडी कायदा लागू झाल्याने या प्रकरणाला अधिक गांभीर्य प्राप्त झाले असून, तपास यंत्रणेला संबंधितांची मालमत्ता जप्त करणे, ठेवीदारांचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक कायदेशीर पावले उचलणे आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत.

या कारवाईमुळे साईसेवा पतसंस्थेच्या अध्यक्ष, सचिव आणि संचालक मंडळाच्या अडचणीत मोठी वाढ झाली असून, प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या घडामोडीकडे हजारो ठेवीदारांचे लक्ष लागले आहे.

# अडचणींवर मात करण्याची क्षमता शिक्षणात: डॉ.पाटेकर



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगाव :** अयुष्यात चांगले घडायचे असेल तर जीवनातील येणाऱ्या प्रत्येक अडचणी वर मात करावी लागते. अडचणींवर मात करण्याची क्षमता दर्जेदार शिक्षणातून विकसित होत असते असे प्रतिपादन डॉ सुरेश पाटेकर यांनी बोलताना व्यक्त केले.श्रीराम माध्य व उच्च माध्य विद्यालय ढोरजळगाव येथे इ ११ वी कला व विज्ञान शाखेत नवप्रविष्ठ विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ प्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे माजी विद्यार्थी व सेवानिवृत्त गटविकास अधिकारी डॉ.सुरेश पाटेकर बोलत होते.

पाटेकर पुढे म्हणाले की कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाची स्थापना ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहचावी या उद्देशाने आबासाहेबांनी केली आणि या उद्देशाने हे संकुल उभे राहिले आणि यामुळेच मी आयुष्यात मोठा झालो.असे त्यांनी बोलताना सांगितले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयात इ ११ वी नव प्रवेशित विद्यार्थ्यांचे मान्यवरांसमवेत विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर औक्षण करून स्वागत करण्यात आले.

देविदास गिऱ्हे,ज्ञानेश्वर उकिर्डे,विद्यालयाचे प्राचार्य संजय चेमटे,पर्यवेक्षिका श्रीम.सुरेखा शेलार,सुरेश तेलोरे,सुधाकर आल्हाट यांचेसह शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल दहातोंडे यांनी तर सूत्रसंचालन अमोल भालसिंग यांनी केले .सौ लता पडवळ यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# कापरेवाडी-शिंदेवाडी शिवारात २७ वीजेचे खांब पाडले

## लाखो रुपयांचे नुकसान : वनविभागावर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** कापरेवाडी (ता.कर्जत) मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतर्गत ग्रामपंचायत हद्दीतील शिंदेवाडी शिवारात सुरू असलेल्या कामाला वन विभागाच्या कारवाईमुळे लाखों रुपयांचा फटका बसला असून सौर ऊर्जा प्रकल्पासाठी उभारण्यात आलेले विजेचे तब्बल २७ खांब वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी जेसीबीच्या साहाय्याने पाडले. शासकीय मालमत्तेचे नुकसान यासह अधिकाऱ्यांनी कोणतेही पूर्व सूचना न देता आपल्या पदाचा गैरवापर केला असल्याची माहिती संबंधित ठेकेदारांनी दिली.

शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी महाजनको आणि महावितरणमार्फत कर्जत परिसरात सौर कृषी वाहिनीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मंजूर आराखड्यानुसार कापरेवाडी-शिंदेवाडी शिवारात ३३ केव्ही वीज वाहिनीचे खांब उभारण्याचे काम सुरू होते. सदरची जमीन खाजगी मालकीची असून त्याची तोंडी संमती घेण्यात आली होती. तसेच या कामासाठी ग्रामपंचायतीची लेखी परवानगी घेतल्याचा दावा महावितरणसह संबंधित शेतकऱ्यांनी केला. मात्र ११ जून रोजी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीही सक्षम प्राधिकरणाची परवानगी किंवा कायदेशीर अधिकार नसताना जेसीबीच्या साह्याने सदर विद्युत वाहिनी पाडून त्याचे मोडतोड केल्याची निदर्शनास आले. या घटनेनंतर महावितरणने तातडीने पाहणी करत शासकीय कामात अडथळा आणि मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी वन विभागाच्या रेहेकुरी येथील संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या नोटीसमध्ये ७ दिवसांच्या आत लेखी खुलासा सादर करण्याचे आदेश दिले असून खुलासा समाधानकारक न आल्यास नुकसानभरपाई वसूल करण्याची आणि शासकीय मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्याची भूमिका घेतली. हा प्रकल्प पूर्ण झाला असता तर परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा हक्काची वीज मिळाली असती. मात्र वन अधिकाऱ्यांच्या कारवाईमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून, दिवसा विजेचा प्रश्न पुन्हा लांबणीवर पडल्याची संतप्त प्रतिक्रिया परिसरातील शेतकऱ्यांनी दिली.

**विनापरवानगी महावितरणने खांब उभे केले - वनविभाग रेहेकुरी**

**कापरेवाडी (ता.कर्जत) राखीव वन गटक्रमांक ११४ मध्ये अवैधरीत्या अनधिकृतपणे वनविभागाची कोणतीही परवानगी न घेता सौर ऊर्जा वाहिनीचे २७ खांब उभे करण्यात आले होते. याबाबत ११ जून २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. वनक्षेत्रात पडलेले सर्व पोल तातडीने वनक्षेत्राबाहेर हलवावेत. या अनुषंगाचे पत्र कापरेवाडीचे सरपंच अनिल खराडे यांना १५ जून रोजी देण्यात आले. या पत्रात खांबाचे काही नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील असे नमूद करण्यात आले होते.**

**खांब पाडल्याने लाखोंचे नुकसान - सागर ढेरे**

**कोणतीही कायदेशीर परवानगी नसताना वन विभागाने मुख्यमंत्री सौर कृषी योजनेचे विजेचे खांब जेसीबी लावून पाडले. यामुळे सरकारी मालमत्तेचे आणि आमचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. वास्तविक पाहता वनविभागाने कोणतीही पूर्वसूचना न देता आमचे मोठे नुकसान केले आहे. पदाचा गैरवापर करणाऱ्या अधिकाऱ्यां विरोधात कायदेशीर कार्यवाही करावी. तसेच आमची नुकसान भरपाई तातडीने मिळावी अशी मागणी या योजनेचे सुपरवायझर सागर ढेरे यांनी वनविभागाकडे केली.**



# श्री.क्षेत्र मांदळीत आत्मारामगिरी बाबांचा प्रकट दिन सोहळा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यातील प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाणारे व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्री.क्षेत्र मांदळी येथील ब्रह्मरुपविदेही आत्मारामगिरी महाराज यांचा प्रकटदिन (जन्मोत्सव) सोहळा शनिवारी, दि.४ जुलै रोजी हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला.

श्री.लालगिर स्वामी बुवा मठ संस्थानच्या वतीने प्रकटदिन सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी टाळ मृदुंगाच्या गजरात पारंपारिक वाद्यांसह वाजत गाजत लालगिर स्वामी, आत्मारामगिरी महाराज यांचा जयघोष करत भक्तीमय वातावरणात लेझीम पथकासह गावातून रथ मिरवणूक प्रदक्षिणा काढण्यात आली. यावेळी पांडुरंगाचा गजर करत जयघोषाने मांदळीनगरी दुमदुमून गेली होती. मिरवणुकीनंतर आरती व पूजा विधी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करून पुष्पवृष्टी करत फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून प्रकटदिन साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे हभप माऊली महाराज कदम (आळंदी देवाची) यांचे हरिकिर्तन कार्यक्रम पार पडले.

मंदिर परिसरात नेत्रदीपक विद्युत रोषणाई करण्यात आली. संपूर्ण मिरवणूक प्रदक्षिणा मार्ग रांगोळ्यांनी सजवून मंदिराचा गाभारा आकर्षक फुलांनी सजवण्यात आला होता. परिसरातील भाविक भक्त दर्शनाकरिता दिवसभर येत असल्याने येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना श्री.लालगिर स्वामी बुवा मठ संस्थानच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. आत्मारामगिरी महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त दर्शनासाठी पहाटेपासून राज्यासह जिल्हाभरातून भाविक भक्तांचा व पायी दिंड्यांचा ओघ वाहत होता. यावेळी दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.येणाऱ्या प्रत्येक भाविकांना सुलभरित्या दर्शन घडवून आणण्यासाठी तसेच महाप्रसाद वाटपाकरिता उत्तम नियोजन करण्यात आले होते. दयावेळी ट्रस्टचे अध्यक्ष धनेश गांगर्डे, सचिव राजेंद्र गांगर्डे, खजिनदार रमेश शिंदे, विश्वस्त केशव हौसराव गांगर्डे, मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी गांगर्डे, विधिज्ञ ॲड. नितीन गवारे, संभाजी बोरूडे, मनोहर रासकर, मुकुंद गांगर्डे, पंडित वाघ, विजय गांगर्डे, संजय गांगर्डे, दीपक घोडके, भगवान गांगर्डे, हौसराव गांगर्डे, हरिश्चंद्र गांगर्डे, चेअरमन बबन गांगर्डे, सुधीर वाघ, सचिन भुजबळ, संपत गांगर्डे, राजेंद्र गांगर्डे, सुधीर बचाटे, शरद गांगर्डे, संदीप गांगर्डे, मयुर वाघुले, पिंटू बचाटे, जालिंदर भुजबळ, संपत गिरमकर यांच्यासह सर्व विश्वस्त मंडळ व पदाधिकारी, कर्मचारी, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

सोमवार दि.०६ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## मांडवे शिवारातून अल्पवयीन मुलगी पळवली

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : मांडवे शिवारात राहणारी पावणे पंधरा वर्षे वयाची अल्पवयीन मुलगी लघुशंकेसाठी घराबाहेर गेली असता, तिला पळवून नेले आहे. श्रीरामपूर तालुक्यातील मांडवे परिसरात राहणारी मुलीची आई लोणी येथे रूग्णालयात पाहुण्यांना भेटायला गेली होती. तेव्हा मुलगी आणि आजी घरी होत्या. रात्री ८ वाजण्याच्या सुमारास सगळे काम आटोपल्यानंतर सदरची अल्पवयीन मुलगी ही लघुशंकेसाठी घराबाहेर गेली असता, बराच वेळ झाला तरी ती आली नाहीत. त्यामुळे आजीने मुलीच्या आईला बोलावून घेत तिचा शोध घेतला, मात्र ती कोठेच आढळून आली नाहीत.त्यामुळे कोणीतरी तिला अमिष दाखवून पळवून नेले.याप्रकरणी लोणी पोलिसात मुलीच्या आईने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अधिक तपास लोणी पोलीस करीत आहे.

# स्व. ससाणे साहेबांच्या दूरदृष्टीने गावच्या वैभवात आणखी भर : आ. ओगले

## बेलापूर रोडवरील भव्य 'छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वारा'चे थाटात लोकार्पण




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : स्वर्गीय जयंतराव ससाणे यांच्या दूरदृष्टीमुळे शहराला खऱ्या अर्थाने वैभव प्राप्त झाले असून, आज त्यांच्याच प्रेरणेतून श्रीरामपूरच्या वैभवात मानाचा तुरा रोवला गेला आहे, असे प्रतिपादन आमदार हेमंत ओगले यांनी केले. माजी आमदार स्व. जयंतराव ससाणे यांच्या जयंतीचे औचित्य साधून बेलापूर रोडवरील भव्य 'छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वारा'चे लोकार्पण करण्यात आले.

### श्रीरामपूरकरांकडून आठवणींना उजाळा; प्रवेशद्वारावर गर्दी

दूरदृष्टी असलेल्या लोकनेत्याने शहरासाठी पाहिलेले स्वप्न त्यांच्याच जयंतीच्या दिवशी पूर्णत्वास जाणे, हा एक अभूतपूर्व योगायोग ठरला. यानिमित्ताने संपूर्ण श्रीरामपूरकरांनी स्व. जयंतराव ससाणे यांच्या आठवणींना उजाळा दिला. नवनिर्मित देखणे प्रवेशद्वार पाहण्यासाठी आज दिवसभर नागरिकांनी बेलापूर रोडवर मोठी गर्दी केली होती.

या सोहळ्याप्रसंगी आमदार ओगले बोलत होते. यावेळी शहरातील व ग्रामीण भागातील विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी आमदार भानुदास मुरकुटे म्हणाले अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नगराध्यक्ष करण ससाणे यांनी विशेष पुढाकार घेऊन अत्यंत नेटकेपणाने पूर्णत्वास नेला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे.माजी आमदार भाऊसाहेब कांबळे सागितले की,स्व. जयंतराव ससाणे यांनी शहराच्या सौंदर्यीकरणासाठी जे स्वप्न पाहिले होते, ते आज प्रत्यक्षात उतरले आहे. हे भव्य-दिव्य प्रवेशद्वार शहराची नवी ओळख बनेल.

नगराध्यक्ष करण ससाणे यांनी सागितले की, स्व. ससाणे साहेबांनी १४-१५ वर्षांपूर्वी शहराला एक भव्य वेस (प्रवेशद्वार) असावी, असे स्वप्न पाहिले होते. तत्कालीन नगराध्यक्ष संजय फंड आणि सन्मित्र मंडळाचे अध्यक्ष अण्णासाहेब डावखर पाटील यांच्या सहकार्याने या कामाची सुरुवात झाली. या सार्वजनिक आणि पवित्र कामासाठी समाजातील सर्व घटकांनी सढळ हाताने मदत केली. मी या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. असे नगराध्यक्ष ससाणे म्हणाले. या ऐतिहासिक सोहळ्याला माजी नगराध्यक्ष संजय फंड, सभापती बाबासाहेब दिघे, जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, सभापती सुधीर नवले, शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, तालुकाध्यक्ष प्रमोद भोसले, उपनगराध्यक्ष कांचन सानप आणि गटनेते मुजफ्फर शेख प्रामुख्याने उपस्थित होते.


तसेच ज्येष्ठ नगरसेवक दिलीप नागरे, मंजुश्री मुरकुटे, दिपाली ससाणे, दीपक वमने, योगेश जाधव, वैशाली पोटे, नागेश्वरी एडके, यास्मिन शेख, नवनीतकौर सेठी, आशिष धनवटे, पंडित बोंबले, राजन चूग, रमेश कोठारी, रमण मुथा, दिलीप सानप, डॉ. दिलीप शिरसाठ, मुन्ना पठाण, राजेंद्र पाऊलबुध्ये, विलास दाभाडे, राजू चक्रनायन, कांतीशेठ पटेल यांच्यासह शहर व ग्रामीण भागातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिबट्याचा धुमाकूळ ; कसार वस्तीवरून पाळीव कुत्र्याची शिकार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील खडी क्रशर परिसरातील कसार वस्तीवर शनिवारी सायंकाळी बिबट्याने पाळीव कुत्र्यावर हल्ला करून त्याला ऊसाच्या शेतात फरफटत नेल्याची घटना घडली. या प्रकारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कसार वस्ती परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा मुक्त संचार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. शनिवारी सायंकाळी घरासमोर असलेल्या पाळीव कुत्र्यावर बिबट्याने झडप घालत त्याला ऊसाच्या शेतात ओढून नेले.

घटनेची माहिती मिळताच सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब कसार यांनी प्रसंगावधान राखून कुटुंबीय, नातेवाईक आणि परिसरातील नागरिकांना सतर्क केले. तसेच वनविभागालाही घटनेची तत्काळ माहिती देण्यात आली. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, यापूर्वीही या परिसरात बिबट्याने शेळ्या व पाळीव कुत्र्यांवर हल्ले करून त्यांना फस्त केले आहे. परिसरात मोठी लोकवस्ती असून जवळच शाळा व महाविद्यालये आहेत. त्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी वनविभागाने तातडीने दखल घेऊन परिसरात पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी वडाळा महादेव ग्रामस्थांनी केली आहे.



तसेच परिसरात नियमित गस्त वाढवून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

## स्लीपर बसमधून बेकायदा मालवाहतूक आरटीओची २७ बसेसवर कारवाई

### दीड लाखांचा दंड

> प्रवाशांच्या सुरक्षिततेशी तडजोड करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही. बेकायदा मालवाहतूक, नियमबाह्य दिवे आणि परवाना अटींचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात अशा धडक मोहिमेला यापुढेही सातत्याने सुरू राहतील,
>
> **अनंत जोशी, उपप्रादेशिक परिवहन, अधिकारी**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : प्रवासी वाहतुकीच्या नावाखाली स्लीपर बसमधून सुरू असलेल्या बेकायदा मालवाहतुकीचा पर्दाफाश करत श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने धडक कारवाई केली. परवाना अटींचे उल्लंघन करून दुचाकी, व्यावसायिक मालाची वाहतूक करणाऱ्या तसेच डोळे दिपविणारे नियमबाह्य 'डॅझलिंग' दिवे बसविलेल्या २७ स्लीपर बसेसवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे १ लाख ४५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असून संबंधित वाहनांवर पुढील कठोर प्रशासकीय कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी यांच्या नेतृत्वात भरारी पथकाने ही विशेष मोहीम राबविली. मोटार वाहन निरीक्षक विशाल बटुळे, विशाल मोरे, सहायक मोटार वाहन निरीक्षक राणी सोनवणे व चालक अनिल दुर्गे यांनी विविध ठिकाणी स्लीपर बसची तपासणी केली. तपासणीत अनेक बसच्या लगेज कंपार्टमेंटमध्ये प्रवाशांच्या सामानाऐवजी दुचाकी वाहने व व्यावसायिक मालाची वाहतूक होत असल्याचे आढळले.

प्रवासी परवान्यावर अशा प्रकारे मालवाहतूक करणे हा मोटार वाहन कायद्याचा भंग असून प्रवाशांच्या जीवाशी खेळ असल्याचे परिवहन विभागाने स्पष्ट केले. अधिकाऱ्यांच्या मते, अतिरिक्त मालामुळे बसचा गुरुत्वमध्य बदलतो. त्यामुळे वळणांवर किंवा उतारावर बस पलटी होण्याचा धोका वाढतो. तसेच ब्रेकिंग यंत्रणा, टायर आणि सस्पेन्शनवर अतिरिक्त ताण येऊन गंभीर अपघात घडण्याची शक्यता निर्माण होते. कारवाईदरम्यान अनेक बसवर बसविण्यात आलेले अतिप्रखर 'डॅझलिंग' दिवेही आढळून आले.

समोरून येणाऱ्या वाहनचालकांची दृष्टी क्षणिक दिपवून अपघातांना कारणीभूत ठरणारे हे दिवे केंद्रीय मोटार वाहन नियमांच्या विरोधात असल्याने त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली. प्रवासी वाहतुकीच्या परवान्यावर व्यावसायिक मालाची वाहतूक करून शासनाच्या महसुलालाही फटका दिला जात असल्याचे तपासणीत स्पष्ट झाले. यामुळे नियमांचे पालन करणाऱ्या वाहतूकदारांमध्ये नाराजी निर्माण होत असल्याचेही अधिकाऱ्यांनी नमूद केले.

## भेंडा येथे रसायनांपासून बनवली जाणारी हातभट्टी उद्ध्वस्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यातील भेंडा येथे मानवी आरोग्यास अत्यंत घातक ठरणाऱ्या आणि रसायनांचा वापर करून तयार केल्या जाणाऱ्या हातभट्टी दारूवर नेवासा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.

या छाप्यात पोलिसांनी ३६,२५० रुपये किमतीची भेसळयुक्त दारू आणि कच्चा माल (नवसागर व गूळ) जप्त केला असून, विषारी दारू जागेवरच ओतून नष्ट करण्यात आला.

मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी भेंडा येथील बानुबाई राजेंद्र पवार हिच्या घराच्या आडोशावर पंचांसमक्ष छापा टाकला.

याप्रकरणी बानुबाई पवार आणि तिचा साथीदार गणेश हौशीराम मोरे यांच्याविरुद्ध भा. न्या. सं. कलम १२३, २२३, २७५ ६५ नुसार महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## विनापरवाना देशी दारू विक्री करणाऱ्यावर कारवाई

### चांदा येथे १६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त.

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई पोलिसांनी अवैध दारू विक्रीविरोधात कारवाई करत एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई शनिवारी (दि. ४ जुलै) सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास नेवासा तालुक्यातील चांदा शंकरवाडी रोडलगत करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र जालिंदर शिंदे (वय ३५, रा. चांदा, ता. नेवासा) हा कोणताही वैध परवाना नसताना स्वतःच्या ताब्यात देशी दारूचा साठा विक्रीच्या उद्देशाने बाळगत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार छापा टाकून त्याच्याकडून देशी दारूच्या २० बाटल्या जप्त करण्यात आल्या. जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे १,६०० रुपये इतकी आहे. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल पोपट अर्जुन आव्हाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०२/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई सोनई पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि अनिल मोरे यांना मिळालेल्या गुप्त बातमीवरून तसेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुरज मेढे,पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव पोलीस कॉन्स्टेबल पोपट अव्हाड यांच्या पथकाने केली पुढील तपास सपोनि अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सफौ मच्छिन्द्र आडकित्ते करीत आहेत. अवैध दारू विक्री व धंदे या विरोधातील अशा कारवाया सोनई पोलीस ठाण्याचे सपोनि अनिल मोरे यांच्या मार्गदर्शना खाली यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस उपनिरीक्षक किशोर जाधव यांनी सांगितले.

## गायरान जमिनीच्या वादातून दलित कुटुंबावर हल्ला

### जातीवाचक शिवीगाळ, विनयभंगाचा आरोप | आठ जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खिर्डी येथे गायरान जमिनीवरील अतिक्रमण आणि विटभट्टी उभारण्याच्या वादातून दलित कुटुंबावर घरात घुसून मारहाण, जातीवाचक शिवीगाळ, महिलेचा विनयभंग तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

याप्रकरणी आठ जणांविरुद्ध श्रीरामपूर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली असून पोलिस पुढील तपास करीत आहेत. फिर्यादी राजेंद्र नारायण सरोदे (वय ५५, रा.खिर्डी) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गावाच्या पश्चिमेकडील गायरान जमिनीवर त्यांनी विटभट्टीसाठी साहित्य टाकले होते.याच कारणावरून गावातील काही व्यक्ती त्यांना विरोध करीत असल्याचे तक्रारीत नमूद आहे. १ जुलै रोजी सायंकाळी सुमारे सहाच्या सुमारास राहुल विठ्ठल धायगुडे, पंकज विठ्ठल धायगुडे, विशाल भगवान म्हसाळ, जालू सोमनाथ देवकाते, बाबासाहेब भाऊसाहेब हाळनोर, जना विटनोर, सिद्धाथ पारखे आणि बाबू हाळनोर यांनी बेकायदेशीर जमाव करून सरोदे यांच्या घरात प्रवेश केला.

यावेळी तक्रारदार व त्यांच्या कुटुंबियांना शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. तसेच अनुसूचित जातीचा उल्लेख करत जातीवाचक अपमानास्पद शब्द वापरल्याचा आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे. या घटनेत तक्रारदारांचा मुलगा संतोष सरोदे याच्यावर वीट फेकून मारल्याने त्याच्या हाताला दुखापत झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तसेच पत्नी सिंधू सरोदे यांना मारहाण करून त्यांचा साडीचा पदर ओढत ब्लाऊज फाडून विनयभंग केल्याचाही आरोप करण्यात आला आहे. आरोपींनी कुटुंबाला राहती जागा सोडण्यास भाग पाडत जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे.

घटनेनंतर गावातील पोलिस पाटील व काही प्रतिष्ठित नागरिकांनी तातडीने तक्रार दाखल न करण्याचा सल्ला दिल्याने काही दिवस विलंब झाल्याचे फिर्यादीने सांगितले आहे. मात्र, आरोपींकडून दहशतीचे वातावरण कायम असल्याने अखेर पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. याप्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध विविध कलमांनुसार तसेच अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास विभागीय पोलीस उपअधीक्षक जयदत्त भवर, करीत आहेत.

## एटीएम बदलून ५० हजारांना घातला गंडा....

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील महाराष्ट्र बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढायला गेलेल्या सेवानिवृत्त सैनिकाचे एटीएम हातचलाखीने बटलून ५० हजारांची फसवणूक केली आहे. याप्रकरणी दोन अनोळखी इसमांविरूद्ध श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव येथील रमेश सोन्याबापू मेहेत्रे, (वय ६६) हे सेवानिवृत्त सैनिक घटनेच्या दिवशी ११.४५ च्या सुमाराम शहरातील छत्रपती शिवाजी महाराज रोडवरील महाराष्ट्र बँकेच्या एटीएममध्ये पैसे काढायला गेले होते.

त्यावेळी त्यांनी एटीएम मशिनमध्ये टाकले परंतु पैसे न येता फक्त पावती निघाली. त्याचवेळी दोन इसम त्यांच्या पाठीमागून आत आले, पैकी एकाने तुम्हाला या एटीएममधून पैसे निघणार नाही, बाजूला आणखी एक मशीन आहे तेथून पैसे काढा, असे म्हणाला.

त्याचवेळी दुसऱ्या व्यक्तीने मशीनचे कोणतेतरी बटण दाबून हातचलाखीने एटीएम कार्ड जागेवर बदली केले व दुसरे कार्ड ठेवले.मेहेत्रे यांच्या लक्षात ही बाब आली नाही.त्यामुळे ते सदर कार्ड घेवून महाराष्ट्र बँकेत अधिकाऱ्यांना भेटले व पैसे निघत नसल्याचे सांगितले.सदरचे एटीएम तपासले असता, हे एटीएम तुमचे नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

तुमच्या एटीएमवरून दुसऱ्यानेच पैसे काढल्याचे त्यांना सांगण्यात आले. मेहेत्रे यांचे एटीएम हातचलाखीने बदलून १०-१० हजार रूपये प्रमाणे पाच वेळा एकूण ५० हजार रूपये अज्ञात इसमांनी काढून नेल्याचे स्पष्ट झाले, तसेच मेहेत्रे यांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमांविरूद्ध श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

## कोणत्याही शेतकऱ्याची जप्ती होऊ देणार नाही रघुनाथदादा पाटील

### शेतकऱ्यांचे थकीत कर्ज हे सरकारच्या चुकीच्या धोरणांचे पाप - अ‍ॅड. अजित काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : राज्य सरकारने सन २०२६ च्या काळात जाहीर केलेली कर्जमाफी ही निव्वळ फसवी असून हा केवळ अटी आणि शर्तींचा खेळ आहे. या जाचक अटींमुळे जास्तीत जास्त शेतकरी कर्जमाफीतून वगळले जाण्याची चिन्हे दिसत आहेत, अशी कडाडून टीका शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी केली. तालुक्यातील खोकर येथील 'सत्यजित फार्म हाऊस'वर शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ड. अजित काळे यांच्या निवासस्थानी एका महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

त्याप्रसंगी पाटील ते बोलत होते. या बैठकीला जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी जवरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रघुनाथ दादा पाटील म्हणाले की, शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्यानेच आज शेतकरी कर्जबाजारी झाला



आहे. शेतकरी संघटना कोणत्याही परिस्थितीत राज्यातील एकाही शेतकऱ्याची जप्ती होऊ देणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. सरकारच्या काही पाळीव संघटना शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. कर्ज कोणतेही असो, आम्ही ते देणार नाही या भूमिकेवर आता शेतकऱ्यांनी ठाम राहिले पाहिजे.

याप्रसंगी बोलताना शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ड. अजित काळे यांनी सरकारच्या धोरणांवर तीव्र आक्षेप घेतला:सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळेच आज शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे थकीत कर्ज हे सर्वस्वी सरकारचेच पाप आहे. जिल्हा बँकांकडून सुरू असलेली सक्तीची वसुली तात्काळ थांबवून शासनाने जिल्हा बँकांना थेट कर्जपुरवठा करावा.

शेतकऱ्यांचा सातबारा कोणत्याही अटी व शर्तींशिवाय सरसकट कोरा करण्यात यावा, या प्रमुख मागणीसाठी आगामी ९ ऑगस्ट (क्रांती दिन) रोजी नांदेड येथे भव्य 'शेतकरी परिषद' आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेला हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ड. काळे यांनी केले. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती आणि सरसकट सातबारा कोरा व्हावा, याच मुख्य उद्देशासाठी शेतकरी संघटनेने सध्या राज्यभर दौरा सुरू केला आहे. या बैठकीला हरियाप्पा तुवर, डॉ. रोहित कुलकर्णी यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.